रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक २३७ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹


## द्रुतगती मार्गावर गॅसचा टँकर पलटी

**खोपोली :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील आडोशी बोगद्याजवळ मंगळवारी (दि.३) सायंकाळी सव्वा पाचच्या सुमारास प्रोपलेन गॅस वाहतूक करणारा टँकर पलटी झाल्याची गंभीर घटना घडली. टँकरमधून गॅसगळती सुरू झाल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव मुंबईकडे जाणारी वाहतूक तात्काळ बंद करण्यात आली. परिणामी, द्रुतगती मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. पुण्याहून मुंबईकडे जात असताना आडोशी बोगद्याजवळील तीव्र वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने टँकर बोगद्याच्या प्रवेशद्वाराजवळच उलटला. •> पान २ वर

## आज पोयनाडमध्ये जाहीर सभा

**शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती**

**रायगड :** आंबेपूर जिल्हा परिषद मतदार संघातून शेकाप महाविकास आघाडीच्या उमेदवार पूजा अजित भगत, आंबेपूर पंचायत समिती मतदार संघातून शेकाप महाविकास आघाडीचे उमेदवार धनंजय चंद्रकांत म्हात्रे तसेच रुईशेत भोमोली पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार रुपेश उघडा यांच्या प्रचारार्थ बुधवारी (दि.४) सायंकाळी साडेपाच वाजता, पोयनाडमध्ये हिरू दलाल नगर येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. शेकाप सरचिटणीस •> पान २ वर






(छायाचित्र : समीर मालोदे)

# भूमीपुत्रांसाठी महाविकास आघाडी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**देशातील मूठभर लोकांच्या हातात सत्ता आणि संपत्ती राहिली पाहिजे, असे भाजपचे राजकारण सुरु आहे. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांसह ज्येष्ठ नेत्यांचे विचार पुसण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या मार्गाने सुरु आहे. आगामी काळात शेतकऱ्यांचे नावही सातबाऱ्यावरून पुसले जाणार आहे. या भागात आता तिसरी मुंबई येऊ घातली आहे. भूमीपुत्रांना देशोधडीला लावण्याचे काम होणार आहे. कोकणातील जमिनी भांडवलदारांच्या घशात घातल्या जाणार आहेत आणि म्हणूनच भूमीपुत्रांच्या हितासाठी महाविकास आघाडीने हा लढा उभारला आहे. भूमीपुत्रांचे अस्तित्व टिकविण्यासाठी आघाडी समर्थपणे लढणार आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत शेकाप, काँग्रेसह महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी केले.**

आवास जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार राजेंद्र उर्फ राजाभाऊ ठाकूर, आवास पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार नयना शिळदणकर, किहीम पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार अनिता शिंदे यांच्या प्रचारार्थ चोंढी नाका येथे मंगळवारी (दि.३) सायंकाळी जाहीर •> पान २ वर

## हर्षवर्धन सकपाळ यांचे प्रतिपादन



### सकपाळांकडून दळवींना टोला

आरसीएफ कंपनीमध्ये स्थानिकांना घेतले जात नाही. रोजगाराचा प्रश्न आहे. लोकप्रतिनिधी स्वाभिमान विकून आहेत. आपले काम झाल्यावर 'हम आपके कौन है' या भूमिकेतून ते वागत आहेत, असा टोला नाव न घेता हर्षवर्धन सकपाळ यांनी आमदार दळवी यांना लगावला. तसेच अशा विकृतीला रोखण्यासाठी शेकापसह काँग्रेस महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्या, असे आवाहनही त्यांनी केले.

### कोकणकरांनो, सावधान

अदानीने पालघरपासून गोव्यापर्यंत जमिनी घेतल्या आहेत. कोकण विकण्याचा घाट सुरु आहे. अदानीला जमिनी देण्याबरोबरच वेगवेगळ्या खाणी विकल्या जात आहेत. भाजप भांडवलदारासाठी काम करीत आहेत. शक्तीपीठ महामार्ग भांडवलदारांसाठी आणला जात आहे. अदानी म्हणजे आताची ईस्ट इंडिया कंपनी आहे. कच्चा माल बाहेर पाठवून पक्का माल आपल्यालाच विकण्याचा प्रयत्न केला जात आहे. कोकणातील शेतकरी, भूमीपुत्र स्वाभिमानी आहेत. संघर्ष त्यांच्या रक्तात आहे. हे टिकवून ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा दुष्काळी भागाची झळ तुम्हालाही लागेल, असे मत सकपाळ यांनी व्यक्त केले.

### खटारा पाडण्यासाठी रुपेरी पडद्याची घेतली मदत

अलिबागमध्ये आता वेगवेगळी मंडळी जमिनी घेत आहेत. भविष्यात भूमीपुत्रांच्या पोटावर लाथ मारली जाणार आहे. त्यामुळे जमिनी कोणाला द्यायच्या हा विचार करणे गरजेचे आहे. येथील लोकप्रतिनिधी आत्महत्या, बलात्कारावर बोलण्यास तयार नाही. परंतु, भूमीपुत्रांचा आवाज बनणाऱ्या शेकापला हरविण्याचा प्रयत्न करीत आहेत. भूमीपुत्रासाठी जेट्टीवर भांडण झाले. स्वाभिमान वाणीने जयंत पाटील झळकले. मात्र, भूमीपुत्रांच्या बाजूने उभ्या राहणाऱ्या नेतृत्वाला पाडण्यासाठी शाहरुख खानने थळमध्ये पैसे पाठविले, असा आरोप हर्षवर्धन सकपाळ यांनी केला.

### चिऊताईच्या संघर्षाला सलाम

हर्षवर्धन सकपाळ यांनी चिऊताई आणि कावळ्याची गोष्ट सांगत अलिबागचे वास्तव नागरिकांसमोर आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की, आग लागत असताना चिऊताई चोचीने पाणी आणून विझविण्याचे काम करीत असते. त्यावेळी कावळा त्यांना थट्टेने विचारतो, 'इवलुशा चोचीतून पाणी आणून आग विझणार का?' त्यावेळी चिऊताई म्हणाल्या, 'आग विझेल की नाही, माहीत नाही, पण भविष्यात आग लावणाऱ्यांच्या यादीत राहायचे की आग विझविण्याचे हे मी ठरविणार आहे', अशी गोष्ट सकपाळ यांनी सांगत शेकाप प्रवक्त्या या आग विझविण्याच्या यादीत असणार आहेत. कारण, एक विचार घेऊन संघर्ष करीत जनतेच्या हितासाठी काम करणाऱ्या चित्रलेखा अर्थात चिऊताई यांनी समाजहिताचा विडा उचलला आहे. त्यामुळे त्यांच्या संघर्षाला सलाम, असे गौरवोद्गार सकपाळ यांनी काढले.

## खोटी बिले काढणाऱ्यांची चौकशी होणार : जयंत पाटील



सध्या सर्वत्र टक्केवारीची समस्या निर्माण झाली आहे. खोटी बिले काढून पैशांची लूट केली जात आहे. त्याविरोधात ही लढाई आहे. खोटी कामे घेऊन बिले काढली जात आहेत. हे थांबविण्यासाठी ही लढाई आहे. महाविकास आघाडीमार्फत ही निवडणूक लढवित आहोत. प्रचाराच्या दरम्यान शेकापसह महाविकास आघाडीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. जिल्हा परिषेदवर शेकाप-महाविकास आघाडीचा झेंडा फडकल्यावर खोटी बिले काढणाऱ्यांविरोधात चौकशीचा ससेमिरा लावला जाईल, अशा इशारा शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी दिला.

गेल्या अनेक दिवसांपासून गावा-गावात प्रचार सुरु आहे. महाविकास आघाडीमार्फत ही निवडणूक लढविली जात आहे. मतदारांकडून चांगली साथ मिळत आहे, त्याचा आनंद आहे. तालुक्यात सर्व जागा जिंकणार, असा विश्वास आहे.

या निवडणुकीत १९७८ प्रमाणे विजय मिळवायचा आहे. त्या पद्धतीने मताधिक्याने जागा जिंकून आघाडीला यश मिळेल. सध्याची परिस्थिती पाहता सरकारच्या कामाचे वीस टक्के घेतले जात आहेत. जिल्हा परिषदेसह •> पान २ वर

## शिवतीर्थावर जनतेचे राज्य पोहोचवा : चित्रलेखा पाटील



या मतदार संघात विचित्र कारभार चालत आहे. कार्पोरेट खोती पद्धत चालविली जात आहे. भूमीपुत्रांच्या जमिनी विकल्या जात आहेत. लँड डिलिंग करून अनेक भाग विकण्याचा धंदा चालविला जात आहे. हा प्रकार रोखला नाही, तर आगामी काळात गावांची ओळख दिसणार नाही, अशी घणाघाती टीका शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केली. विधानसभा निवडणुकीत एकमेकांना शिव्या देणारे आज त्यांच्या घराच्या पायऱ्या झिजवत आहेत. त्यामुळे हा बदला घ्यायचा आहे. शिव्याशाप देणाऱ्या महिलेला जिजाऊंच्या नावाने पुरस्कार दिला जातो. ही मोठी चिंताजनक बाब आहे. त्यामुळे कुठे ठेवले आहे राजकारण, असा प्रश्न कायमच पडत आहे. यावेळी परिवर्तन निश्चितच होणार. हा मतदारसंघ काँग्रेस व शेकापचा आहे. पुढची पिढी घडविण्यासाठी राजाभाऊ ठाकूर यांना निवडून द्या. दिलीप भोईर यांचे डिपॉझीट जप्त झाले पाहिजे, अशा पद्धतीने सर्वांनी ताकदीशी काम करा. जनतेचे राज्य शिवतीर्थावर पोहोचवा, हीच खरी दिवंगत मधुकर ठाकूर अर्थात पप्पांना श्रद्धांजली असेल, असे चित्रलेखा पाटील म्हणाल्या.



## मविआ गटनेतेपदी केतन भगत

**पनवेल :** शेतकरी कामगार पक्ष व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे युवा नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे केतन राम भगत यांची पनवेल महानगरपालिकेत महाविकास आघाडीच्या गटनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली. या निवडीमुळे पनवेलमधील महाविकास आघाडीची संघटनात्मक ताकद अधिक बळकट झाल्याचे मानले जात आहे. केतन भगत यांच्या निवडीला सर्व घटक पक्षांच्या नगरसेवकांनी •> पान २ वर

## बाहे गावातील महिलांचा मतदानावर बहिष्काराचा इशारा

**पाणीटंचाईच्या प्रश्नावर ऐन निवडणुकीत संताप उसळला**



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील बाहे गावात पाणीपुरवठ्याच्या गंभीर समस्येमुळे महिलांनी येत्या ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. पाणीप्रश्न तातडीने सोडवला नाही, तर मतदान न करण्याबरोबरच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याचा निर्णय महिलांनी जाहीर केला आहे.

याबाबत माहिती देताना एकता ग्रामसंघ महिला बचतगटाच्या अध्यक्षा रिया देवकर यांनी सांगितले की, २०१४-१५ मध्ये गावातील नळपाणी पुरवठा योजना आणि 'हर घर जल' योजनेची कामे पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दाखवण्यात आले. मात्र प्रत्यक्षात आजतागायत गावातील महिलांना पिण्याच्या पाण्याची सुविधा •> पान २ वर

## हिंमत असेल तर जेलमध्ये टाकून दाखवा

**आ. बाबासाहेब देशमुखांचे शहाजीबापूंना खुलं आव्हान**

**। सांगोला । प्रतिनिधी ।**

जिल्हापरिषदेच्यानिवडणुकीच्या निमित्ताने सांगोला तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शेतकरी कामगार पक्षाचे आमदार बाबासाहेब देशमुख यांनी माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्यावर सडकून टीका केली आहे. माझ्या कार्यकर्त्याला जेलमध्ये घालण्याची धमकी देण्यापेक्षा, मी गणपतराव देशमुख साहेबांचा नातू आहे, हिंमत असेल तर मला जेलमध्ये घालून दाखवा, अशा शब्दात बाबासाहेब देशमुखांनी शहाजीबापूंना खुलं •> पान २ वर

## म्हसळ्यात शिंदे गटाला पुन्हा धक्का

- उपनगराध्यक्ष अनिकेत पानसरे प्रभारी नगराध्यक्ष
- तटकरे-गोगावले संघर्षात तटकरेंनी मारली बाजी



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा नगरपंचायतीत आधी सात नगरसेवक अपात्र ठरल्याने राज्याचे मंत्री भरत गोगावले यांच्या शिंदे गटाला बसलेला मोठा राजकीय धक्का अजून सावरत नाही, तोच आता उपनगराध्यक्ष अनिकेत पानसरे यांची प्रभारी नगराध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने पुन्हा एकदा जोरदार धक्का मानला जात आहे. खासदार सुनील तटकरे यांनी नगरपंचायतीतील सत्तेचे गणित एका झटक्यात पालटले असून, हा तटकरे विरुद्ध गोगावले संघर्षातील निर्णायक टप्पा मानला जात आहे. म्हसळा नगरपंचायतीत झालेल्या या घडामोडींनी रायगडच्या राजकारणात खळबळ उडवली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमधून शिवसेना शिंदे गटात गेलेल्या नगराध्यक्षांसह सात नगरसेवकांविरोधात गटनेते संजय कर्णिक यांनी उभारलेल्या कायदेशीर लढ्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना अपात्र ठरविले. यानंतर नगरपंचायतीतील सत्तासमीकरण पूर्णपणे बदलले. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मंगळवारी उपनगराध्यक्ष अनिकेत पानसरे यांची प्रभारी नगराध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. या निर्णयामुळे तटकरे आणि गोगावले यांच्यातील राजकीय संघर्षात तटकरे यांनी बाजी मारल्याचे स्पष्ट झाले. पानसरे यांच्या निवडीचे गटनेते संजय कर्णिक यांनी स्वागत करत अभिनंदन केले.

या निवडीबाबत खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, तालुका अध्यक्ष समीर बनकर आणि सर अध्यक्ष रियाज घराडे यांनी शुभेच्छा दिल्या. पानसरे यांच्या निवडीनंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. यावेळी माजी उपनगराध्यक्ष संजय दिवेकर, सरोज म्हशीलकर, जयश्री कापरे, सुनील शेडगे, नौशीन चोगले आणि स्वीकृत नगरसेवक निकेश कोकचा यांनी त्यांचे अभिनंदन केले. अधिकृत सूत्रांनुसार, लवकरच नगराध्यक्ष पदाची •> पान २ वर

**ग्रामीण आरोग्य सेवेवर गंभीर परिणाम** | **जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांसह तालुका आरोग्य अधिकाऱ्यांची पदे रिक्त**

## आरोग्य विभागात रिक्त पदांचे संकट

प्रमोद जाधव

। रायगड ।

**रायगड जिल्हा परिषद आरोग्य विभाग सध्या गंभीर मनुष्यबळ टंचाईचा सामना करत असून, पूर्णवेळ जिल्हा आरोग्य अधिकारी नसणे आणि अनेक तालुक्यांमध्ये तालुका आरोग्य अधिकारी पदे रिक्त असणे, ही चिंताजनक बाब ठरली आहे. शासनाच्या उदासीनतेमुळे ही पदे दीर्घकाळ भरली जात नसल्याने ग्रामीण आरोग्य यंत्रणेवर थेट परिणाम होत असून, निर्णयक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अभावाचा फटका थेट रुग्णांना बसत आहे.**

### ४४१ पदे रिक्त

जिल्हा परिषद आरोग्य विभागात आरोग्य पर्यवेक्षक, औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सहाय्यक (महिला व पुरुष) आणि प्रशिक्षित दायी अशी एकूण ४४१ पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमुळे सध्या कार्यरत असलेल्या ६२४ कर्मचाऱ्यांवर प्रचंड कामाचा ताण पडत असून, त्याचा परिणाम सेवा गुणवत्तेवर होत आहे. ग्रामीण नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी ही पदे तातडीने भरण्याची मागणी होत आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्या तब्बल १६ लाख ६४ हजार असून, सुमारे १,८०० हून अधिक गावे व वाड्यांचा समावेश आहे. या विस्तीर्ण ग्रामीण भागाला आरोग्य सेवा पुरविण्यासाठी ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २८० उपकेंद्रे कार्यरत आहेत. वाढते औद्योगिकीकरण आणि त्यातून वाढलेले नागरिकीकरण यामुळे आरोग्य सेवेवरील ताण दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, उपलब्ध मनुष्यबळ अपुरे असल्याने कार्यरत आरोग्य अधिकारी व सेवकांना तारेवरची कसरत करत सेवा द्यावी लागत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमध्ये एकूण ५५८ पदे रिक्त असून, त्यात ४८२ पदे पुरुष व महिला आरोग्य सेवकांची आहेत. या रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवा कमकुवत होत चालल्याची भीती व्यक्त होत आहे. गावांमध्ये आवश्यक सुविधा नसल्याने रुग्णांना तालुका व जिल्हा मुख्यालयात उपचारासाठी धाव घ्यावी लागत आहे.



जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे जिल्हा आरोग्य अधिकारी मनिषा विखे यांच्यानंतर या पदावर पूर्णवेळ अधिकारी नियुक्त करण्यात आलेला नाही. सध्या कुष्ठरोग विभागाच्या डॉ. प्राची नेहूलकर यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असून, प्रभारी व्यवस्थेवरच जिल्ह्याचा आरोग्य कारभार सुरू आहे. तालुका स्तरावरही परिस्थिती चिंताजनक आहे. जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी केवळ ११ तालुक्यांत तालुका आरोग्य अधिकारी •> पान २ वर

## आदिवासीवाडीतील पाण्याचा प्रश्न सुटणार

**जयंत पाटील यांनी सागरगड माची येथे नागरिकांशी साधला संवाद**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील सागरगड माची येथील आदिवासीवाडीत निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईची दखल शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी घेत मंगळवारी (दि.३) सकाळी प्रत्यक्ष भेट देत ग्रामस्थांशी संवाद साधला. पाण्याच्या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन ती लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला असून, त्यामुळे या वाडीतला पाण्याचा प्रश्न लवकरच सुटणार असल्याची आशा निर्माण झाली आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून सागरगड माचीतील आदिवासीवाडी पाणीटंचाईने त्रस्त आहे. यासंदर्भात शेकाप कार्यकर्त्यांनी जयंत पाटील यांची भेट घेऊन समस्या मांडली होती. त्यानंतर पाटील यांनी थेट आदिवासीवाडीत जाऊन स्थानिक नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या व पाणीपुरवठ्याबाबत तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या या भेटीमुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी प्रफुल्ल पाटील, संतोष गुरव, विलास वालेकर, नरेश गोंधळी, सागर गुरव, सिध्देश गोंधळी, नामदेव पाटील, उदय वेळे, रवींद्र नाईक, रोहन वालेकर, मोहन नाईक, गजानन नाईक, अर्जुन नाईक, गोविंद्र नाईक, रतन नाईक, माजी सरपंच रंजना नाईक, सचिन नाईक, आनंद नाईक, देवेंद्र नाईक, अरुण नाईक, राहुल नाईक, अनिता नाईक, चंद्रकांत नाईक आणि अंकुश नाईक आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबाबत संभ्रम

## दोन्ही गटांत परस्परविरोधी दावे

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाबाबतचा तिढा अधिकच वाढताना दिसत आहे. शरद पवार यांच्या गटाकडून विलिनीकरणासंदर्भात चर्चा झाल्याचा दावा केला जात असताना, अजित पवार गटाकडील नेत्यांकडून हे दावे फेटाळून लावण्यात येत आहेत. त्यामुळे राज्यातील राजकीय वर्तुळात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांसोबत बंद दाराआड काही मिनिटांची चर्चा झाल्याचे समजते. या भेटीमागचे नेमके कारण स्पष्ट झाले नसले, तरी राज्यातील बदललेल्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या भेटीकडे महत्त्वाने पाहिले जात आहे.

### चर्चा झाल्याचा दावा

दरम्यान, १२ फेब्रुवारी रोजी हे दोन्ही पक्ष एकत्र येणार होते, असा दावा शरद पवार गटाच्या नेत्यांनी केला. यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्याकरता शरद पवारांच्या अध्यक्षतेखाली बैठकही झाली असल्याची माहिती शरद पवारांच्या गटातील अनेक नेते देत आहेत. परंतु, विलीनकरणासंदर्भात कोणतीही चर्चा झाली नसल्याचा दावा अजित पवारांच्या गटातील नेत्यांकडून केला जात आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यातील राजकीय समीकरणे बदलली असून, सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर अजित पवार गटाकडून भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी झालेली ही पहिलीच भेट ठरली आहे. राष्ट्रवादीचे पुढील नेतृत्व सुनेत्रा पवार यांच्याकडे जाणार असल्याची चर्चा असतानाच, दोन्ही राष्ट्रवादी गटांच्या विलिनीकरणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, या सर्व राजकीय स्थितीबाबत प्रफुल्ल पटेल यांनी दिल्लीतील नेत्यांशी चर्चा केल्याचे सांगितले जात आहे. तसेच सुनेत्रा पवार लवकरच दिल्ली दौऱ्यावर जाण्याची शक्यता असून, त्यादेखील पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांची भेट घेणार असल्याची चर्चा आहे.

एकूणच, दोन्ही राष्ट्रवादी गटाच्या विलिनीकरणाची राजकीय वर्तुळात निव्वळ चर्चा असल्याचे समजते. अजित पवार यांच्या निधनाला काही दिवसच उलटले असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणावरून राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा मतभेद उफाळून आलेत. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणावर अनिश्चिततेचे सावट दाटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट संभाव्य विलीनीकरणाबाबत परस्परविरोधी दावे करताना दिसत आहेत.

# सुनेत्रा पवार पुणे, बीडच्या पालकमंत्रीपदी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची पुणे आणि बीड जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती करण्यात



आली आहे. याबाबतचा अधिकृत शासन निर्णय मंगळवारी जारी करण्यात आला. अजित पवार यांच्या निधनानंतर या दोन्ही महत्त्वाच्या जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी कोणाकडे जाणार, याबाबत राजकीय चर्चा सुरू होती.

पुणे हा औद्योगिक, शैक्षणिक आणि प्रशासकीयदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा मानला जातो, तर बीड दुष्काळग्रस्त आणि

# संसदेत राडा; खासदार निलंबित

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भाषणादरम्यान मंगळवारी पुन्हा गोंधळ झाला. राहुल गांधींचे भाषण सुरू असताना झालेल्या गोंधळादरम्यान विरोधी पक्षाच्या खासदारांनी थेट टेबलांवर चढून सभापतींच्या व्यासपीठावर कागदपत्रे फेकली.

कागदपत्रे फेकणाऱ्या सर्व विरोधी खासदारांवर सभापती ओम बिर्ला यांनी कडक कारवाई केली आहे. सभापतींनी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी आठ विरोधी खासदारांना निलंबित केले आहे. हे सर्व खासदार आता अर्थसंकल्पीय अधिवेशनात सहभागी होऊ शकणार नाहीत. निलंबित केलेले खासदार काँग्रेस आणि सीपीएमचे आहेत.

निलंबित केलेल्या विरोधी लोकसभा खासदारांमध्ये अमरिंदर सिंग राजा वारिंग, डीन कुरियाकोसे, किरण कुमार रेड्डी आणि काँग्रेसचे माणिकम टागोर तसेच गुरजीत सिंग औजला, हिबी एडन, प्रशांत पोडोले आणि एस. वेंकटेश्वरन यांचा समावेश आहे. सभागृहात कागदपत्रे फेकल्याबद्दल आणि सभापतींच्या व्यासपीठाचा अनादर केल्याबद्दल त्यांना चालू अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी लोकसभेतून निलंबित करण्यात आले आहे.

दरम्यान, सोमवारी संसदेत २०२० साली झालेल्या भारत आणि चीन यांच्या सीमारेषेवरील संघर्षावरून मोठा गदारोळ झाला होता. त्यावरून कामकाज तहकूब करण्यात आले होते. आजही या गोंधळामुळे संसदेचे कामकाज विस्कळीत झाले. दुपारी २ वाजता संसद पुन्हा सुरू झाली, त्यानंतर राहुल गांधींनी पुन्हा भाषणाला सुरुवात केली.

# व्हॉट्सॲप-मेटाला न्यायालयाचा दणका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

देशाचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी व्हॉट्सॲप आणि त्याची मूळ कंपनी मेटाच्या डेटा शेअरिंग धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त करत कंपन्यांना फटकारले आहे. युझर्सची गोपनीयता हा मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट करत, युझरचा डेटा कोणत्याही परिस्थितीत इतर प्लॅटफॉर्मवर शेअर केला जाणार नाही, असे स्पष्ट नमूद असलेले लेखी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. असे प्रतिज्ञापत्र न दिल्यास संबंधित याचिका फेटाळली जाईल, असा इशाराही देण्यात आला.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने व्हॉट्सॲपच्या प्रायव्हसी पॉलिसीतील गुंतागुंतीच्या भाषेवर आक्षेप घेतला.

# कर्जतमध्ये महिला मतदारांचे प्राबल्य

## तालुक्यात १ लाख ७० हजारांहून अधिक मतदार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



रायगड जिल्हा परिषद आणि कर्जत पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातील मतदारसंख्या लक्षवेधी ठरत आहे. तालुक्यातील सहा जिल्हा परिषद गट आणि १२ पंचायत समिती गणांमध्ये एकूण १,७०,७०२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून, त्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे.

तालुक्यात पुरुष मतदार ८४,७७७ तर महिला मतदार ८५,९२५ असून, तब्बल १,१४८ महिला मतदार अधिक असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते. विशेष म्हणजे, सहापैकी बहुतांश जिल्हा परिषद गटांमध्ये तसेच १२ पैकी ९ पंचायत समिती गणांमध्ये महिला मतदारांचे प्राबल्य दिसून येते.

जिल्हा परिषद गटनिहाय मतदारसंख्या पुढीलप्रमाणे आहेत. कळंब गट २८,५९३ (पोशीर गण १३,४९२, कळंब गण १४,८०४), कशेळे गट २८,४३१ (पाथरज गण १५,६०५, कशेळे गण १२,८२६), माणगाव तर्फे वरेडी गट २९,७७७ (माणगाव तर्फे वरेडी गण १५,४९१, उकरूळ गण १४,३८६), नेरळ गट ३०,६२७ (नेरळ गण १७,४८६, दामत गण १२,८७१), कडाव गट २६,७८९ (वाकस गण १२,७९२, कडाव गण १३,९९४), मोठे वेणगाव गट २६,४८५ (मोठे वेणगाव गण १२,०७९, बीड बुद्रुक गण १४,४०६), पंचायत समितीच्या पोशीर, कळंब, कशेळे, उकरूळ, नेरळ, दामत, कडाव, मोठे वेणगाव आणि बीड बुद्रुक या नऊ गणांमध्ये महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. एकूणच, कर्जत तालुक्यातील निवडणुकीत महिला मतदार निर्णायक ठरणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

एकूणच, कर्जत तालुक्यातील मतदारसंख्येची ही आकडेवारी पाहता यंदाच्या निवडणुकीत महिला मतदारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार असून, निकालाच्या समीकरणात त्यांचा निर्णायक प्रभाव राहणार आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी महिला मतदारांना केंद्रस्थानी ठेवून रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.

# तरुणी बेपत्ता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

१९ वर्षीय तरुणी राहत्या घरातून कोणास काहीएक न सांगता कोठेतरी निघून गेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. दिप्ती हेमंत मोरे (१९) असे या तरुणीचे नाव असून, ती भाताण येथे



राहणारी आहे. ती अंगाने सडपाताळ, रंग निमगोरा, उंची ५.१, चेहरा-उभट, डोकिचे केस लांब, डोळे काळे, अंगामध्ये अंगामध्ये नेसुस पिवळ्या रंगाचा सलवार कुर्ता, पायामध्ये राखाडी रंगाचे सँडेल आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो.शि. जी.एस. जादव यांच्याशी संपर्क साधावा.

# ट्रकमधील डिझेल चोरी करणारी दुकली गजाआड

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलजवळील मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवरील ॲमेटी युनर्व्हसीटी येथील ट्रक पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या ट्रकमधील डिझेल चोरी करणाऱ्या दुकलीला पनवेल तालुका पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेल्या गाडीसह चोरीचे डिझेल असा मिळून जवळपास १ लाख ६२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे.

फिर्यादी मोहम्मद साहिल लियाकत अली (२८) हे त्यांचे ताब्यातील कंटेनर ट्रक क्रे. एचआर-६१/ई-६७४२ हा मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवरील ॲमेटी युनर्व्हसीटी येथील ट्रक पार्किंगमध्ये पार्क करुन विश्रांती घेत असताना तीन अनोळखी व्यक्तींनी फिर्यादी यांचे ट्रकमधील १५० लिटर डिझेल चोरी करुन पळून गेले म्हणून अज्ञात चोरट्या इसमांविरूद्ध पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होताच वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गिजे, पोलीस उपनिरीक्षक राजपूत, पोहवा देवरे, कुदळे, तांडेल, धुमाळ, म्हारसे, बाबर, पोशी आकाश भगत आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासद्वारे आरोपी प्रमोदकुमार दुर्गा सिंग(३१) व अजय उर्फ उम्या गजानन खंदारे (१८) या दोघांना नवी मुंबई येथून ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली सफेद रंगाची स्वीफ्ट डिझायर व १४० लीटर डिझेल असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



पनवेल तालुका पोलिसांनी घेतले ताब्यात

# सुवर्णकारांचे आराध्य दैवत संत नरहरी सोनार महाराज

दि. ४ फेब्रुवारी रोजी संत नरहरी सोनार महाराजांच्या ७४० व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले जाते. वारकरी संप्रदायातील हे थोर संत हरि-हर एकत्वाचा संदेश देणारे म्हणून ओळखले जातात. मूळचे शिवभक्त असलेले नरहरी महाराज पंढरपूर येथे सुवर्णकार व्यवसाय



करीत होते. मल्लिकार्जुनाची पूजा केल्याशिवाय ते कोणतेही काम सुरू करत नसत. विठ्ठलभक्त सावकारासाठी सोन्याची साखळी तयार करताना घडलेल्या प्रसंगातून त्यांना शिव आणि विठ्ठल एकच असल्याचा साक्षात्कार झाला. त्या अनुभवानंतर त्यांच्या आयुष्याला वेगळे वळण मिळाले. नरहरी महाराजांनी समाजातील हरि-हर वाद दूर करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. ''संसार करता करता परमार्थ साधता येतो'' हा त्यांचा संदेश लोकांपर्यंत अभंगांच्या माध्यमातून पोहोचला. त्यांच्या रचनांमध्ये भक्ती, तत्त्वज्ञान आणि जीवनमूल्यांचा सुंदर संगम दिसतो. सुवर्णकार समाजासह वारकरी परंपरेत त्यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. संत नरहरी महाराजांचे जीवन केवळ भक्तीपुरते मर्यादित नव्हते, तर ते समाजप्रबोधनाचे माध्यमही ठरले. विविध पंथ, श्रद्धा आणि विचारांना एकत्र आणत त्यांनी समन्वयाची शिकवण दिली. त्यांच्या अभंगांमधून विवेक, संयम, सदाचार आणि ईश्वरनिष्ठा यांचा संदेश मिळतो. त्यामुळेच त्यांची कीर्ती महाराष्ट्राबरोबरच देशभर पसरली. माघ वद्य तृतीयेच्या दिवशी त्यांनी विठ्ठल चरणी आत्मसमर्पण केले, अशी भक्तपरंपरेतील श्रद्धा आहे. संत नरहरी सोनार महाराजांचे जीवन हे भक्ती, समन्वय आणि समाजप्रबोधनाचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

**– हेमकांत सोनार**

पान १ वरून

## द्रुतगती मार्गावर गॅसचा टँकर पलटी

प्रोपलेन हा अत्यंत ज्वलनशील व स्फोटक गॅस असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. अपघाताची माहिती मिळताच बोरघाट पोलीस, आयआरबी महामार्ग पोलीस, देवदूत यंत्रणा आणि हेल्प फाऊंडेशनची आपत्कालीन पथके घटनास्थळी दाखल झाली. खोपोली अग्निशमन दलानेही तात्काळ हजेरी लावत गॅसगळती रोखण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले. विशेष तांत्रिक पथकाला पाचारण करण्यात आले आहे. धोका लक्षात घेऊन मुंबई लेनवरील वाहतूक पूर्णपणे थांबविण्यात आली असून, पुण्याकडील वाहतूकही नियंत्रित करण्यात येत आहे. वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## हिंमत असेल तर जेलमध्ये टाकून दाखवा

आव्हान दिलं आहे.

कोळा जिल्हा परिषद गटाच्या प्रचार सभेत आमदार बाबासाहेब देशमुख बोलत होते. यावेळी त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर आणि दडपशाहीच्या राजकारणावर जोरदार प्रहार केला. दोन दिवसांपूर्वी शहाजीबापू पाटील यांनी एका सभेत शेकापच्या कार्यकर्त्यावर कारवाई करण्याचे संकेत दिले होते. त्याचा समाचार घेताना बाबासाहेब देशमुख म्हणाले की, तुमचं सरकार आहे म्हणून गरीब कार्यकर्त्यांना वेठीस धरु नका. या तालुक्यातली जनता आता तुमची दादागिरी सहन करणार नाही. कार्यकर्त्यांच्या केसालाही धक्का लागला, तर बाबासाहेब देशमुख शांत बसणार नाही असे ते म्हणाले. शहाजीबापूंनी विधानसभा निवडणुकीत सात हजार कोटींचा निधी आणल्याचा दावा केला होता. त्यावर बोलताना बाबासाहेब म्हणाले, जर सात हजार कोटी रुपये आले होते, तर मग आज ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था का आहे? तो पैसा नेमका कुठे गेला, याचे उत्तर आधी जनतेला द्या, असा सवाल करत आमदार बाबासाहेब देशमुख यांनी शहाजीबापू पाटील यांच्यावर जोरदार टीका केली.

विरोधकांकडून सातत्याने विचारल्या जाणाऱ्या ५० वर्षांच्या हिशोबावरही बाबासाहेब देशमुख यांनी भाष्य केले. स्वर्गीय आबासाहेबांनी ५० वर्षांत काय केलं, हे इथल्या कष्टकरी शेतकऱ्याला आणि घराघरात पोहोचलेल्या पाण्याला विचारा. हिशोब मांडायला तुमचं आयुष्य पुरणार नाही, एवढे उपकार आबासाहेबांनी या तालुक्यावर केले आहेत, असेही त्यांनी ठणकावून सांगितले. बाबासाहेब देशमुखांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे सांगोल्यात राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## बाहे गावातील महिलांचा मतदानावर बहिष्काराचा इशारा

मिळालेली नाही. पाण्यासाठी महिलांना मोठी पायपीट करावी लागते. या प्रश्नाबाबत पंचायत समिती तसेच देवकान्हे ग्रामपंचायतीकडे यापूर्वी अनेकदा लेखी तक्रारी देण्यात आल्या. तरीही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने समस्या कायम आहे, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, ३ फेब्रुवारी रोजी गटविकास अधिकाऱ्यांनाही पुन्हा लेखी निवेदन देण्यात आले आहे. ''दोन दिवसांत ठोस निर्णय झाला नाही, तर आम्ही मतदानावर पूर्ण बहिष्कार टाकू. तसेच पाणीप्रश्नासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणालाही बसू,'' असा इशारा महिलांनी दिला आहे. पाणीपुरवठ्याच्या मूलभूत प्रश्नावर प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी गावातील महिलांकडून होत आहे.

## आज पोयनाडमध्ये जाहीर सभा

जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सभा होणार आहे. यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे आदी मान्यवरांसह शेकाप व महाविकास आघाडीतील वेगवेगळे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला उपस्थित राहणार आहेत.

## म्हसळ्यात शिंदे गटाला पुन्हा धक्का

निवडणूक जाहीर होण्याची शक्यता असून, तोपर्यंत अनिकेत पानसरे प्रभारी नगराध्यक्ष म्हणून कामकाज पाहतील. म्हसळा नगरपंचायतीतील या बदलामुळे पुढील राजकीय समीकरणांवर दूरगामी परिणाम होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## आरोग्य विभागात रिक्त पदांचे संकट

कार्यरत आहेत. पोलादपूर, महाड, तळा आणि मुरूड या तालुक्यांमध्ये ही पदे अद्याप रिक्त आहेत. पूर्णवेळ तालुका अधिकारी नसल्याने ग्रामीण आरोग्य यंत्रणा अक्षरशः आजारी पडल्याचे चित्र दिसत आहे. या गंभीर स्थितीकडे शासनाकडून गांभीर्याने पाहिले जात नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

## भूमीपुत्रांसाठी महाविकास आघाडी

सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी सकपाळ बोलत होते. यावेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, शेकाप ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, काँग्रेसचे नेते महेंद्र घरत, शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, आवास जिल्हा परिषद मतदारसंघाचे उमेदवार राजाभाऊ ठाकूर, आवास पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार नयना शिळदनकर, किहीम पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार अनिता शिंदे, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष सुनील थळे, काका ठाकूर, योगेश मगर, अशोक चव्हाण, ॲड. विजय पेढवी, संदीप गायकवाड आदींसह शेकाप, काँग्रेस, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे व इतर मित्र पक्ष महाविकास आघाडातील पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ म्हणाले की, भारत देश स्वातंत्र्य झाल्यावर गरिबी, बेरोजगारी, दारिद्र्य मोठ्या प्रमाणात होते. पंडित जवाहर लाल नेहरुंसह अनेक पंतप्रधान होऊन गेले. त्यावेळी शेतकरी, सैनिकांच्या मागे राहण्याची भावना होती. राष्ट्रीय बँकांसह तेल कंपन्यांचे राष्ट्रीयीकरणासह गरिबी हटावसाठी काँग्रेसने प्रयत्न केले. मोबाईलसह संगणकीय राज देशामध्ये निर्माण केले. खुली अर्थव्यवस्था निर्माण केली. आपला माल विदेशात विकण्याची व्यवस्था केली. अर्थव्यवस्थेला एक वेगळा आयाम देण्याचे काम केले. सक्तीच्या शिक्षणासह वनहक्क कायदा, अन्नसुरक्षा कायदा आणला. संविधान व लोकशाही प्रगल्भ करण्यासाठी अनेकांनी मेहनत घेतली. पंचायत राज प्रणाली आणून जनतेला आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मजबूत करण्याचा प्रयत्न केला. रोजगाराचे दालन खुले व्हावे, म्हणून रोजगार हमी योजना सुरू केली. मात्र, सध्याच्या पंतप्रधानांना प्रगतीचा कोणताच आयाम नाही. निराशाजनक असा अर्थसंकल्प त्यांनी सादर केला आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार मध्यमवर्गासाठी कोणत्याही प्रकारचे तिहि या अर्थसंकल्पात नाही, अशी परिस्थिती आहे.

देशात काला धन आणू, दहशतवाद कमी करू, शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या मजबूत करू, अशा घोषणा देत मते मिळविली. परंतु, पेहलगामसह अनेक ठिकाणी झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील दहशतवादी कुठून आले याचा थांगपत्ता अजूनही लागला नाही. काला धन देशात आला नाही. शेतकरी आजही आत्महत्या करीत आहेत. त्यांनी तयार केलेल्या उत्पादनाला भाव नाही, अशी परिस्थिती आहे. फक्त भांडवलदारांचा फायदा बघण्याचा प्रयत्न भाजपचे सरकार करीत आहेत. ५६ इंच छातीचे पंतप्रधान ट्रम्पसमोर मांजर झाले आहेत. भारताला फसवणारा आणि खोटं बोलणारा हा माणूस आहे. 'हर घर नल'च्या नावाने योजना आणली. मात्र, आजही अनेक ठिकाणी पाण्याची समस्या आहे. वेगवेगळ्या महामार्गाच्या योजना राबविल्या जातात. मात्र, आजही अनेक गावांतील रस्ते खराब आहेत. याकडे मात्र प्रत्यक्ष दुर्लक्ष होत असल्याचा आरोप सकपाळ यांनी केला आहे.

बोथट झालेल्या भावनांचा फायदा भाजप घेत आहे. लाडकी बहीण योजना आणली. परंतु, केवायसी करून लाडक्या बहिणी थकल्या आहेत. त्यांच्या खात्यात पैसे जमा झाले नाही. आता फक्त 'पैसा फेको तमाशा देखो' असा प्रकार निवडणुकीच्या काळात भाजप करीत आहे. 'नाच मेरे बुलबूल तुम्हे पैसा मिलेगा' अशी पध्दत सुरू आहे. त्यामुळे अशा आमिषाला बळी न पडता महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन सकपाळ यांनी केले.

सध्या अदानी आणि अंबानीला देश विकला जात आहे. नवी मुंबईच्या विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्यास टाळाटाळ होत आहे. मात्र, हे विमानतळ अदानीसारखे भांडवलदार चालवित आहे. एन.एम. इंटरनॅशनल नावाने विमानतळ चालविला जात आहे. हे रोखण्यासाठी सर्व नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीला मतदान करून जिल्हा परिषदेवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकवा, असे हर्षवर्धन सकपाळ म्हणाले.

## खोटी बिले काढणाऱ्यांची चौकशी होणार : जयंत पाटील

पंचायत समितीमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालू आहे. त्याविरोधात काम करायचे आहे. या तालुक्यामध्ये शेकाप, काँग्रेस, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष या महाविकास आघाडीचे यश असणार आहे. हिंदुत्वाच्या नावाने मते मिळविण्याचा प्रयत्न भाजपवाले करीत आहेत. हिंदुत्व सांभाळण्याची मक्तेदारी फक्त त्यांनीच घेतली आहे, असा दिखावा करतात. प्रत्यक्षात मात्र महाराष्ट्राच्या संस्कृतीला, परंपरेला काळीमा फासण्याचे काम ही मंडळी करीत आहे. हे कदापि खपवून घेतले जाणार नाही. त्याविरोधात ही लढाई आहे. पुढील काळात आक्रमक होऊन काम करावे लागणार आहे. या निवडणुकीत थळसह चेंढरे आदी सर्वच मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून येणार आहेत. त्या पद्धतीने आघाडीने निश्चय केला आहे. या मतदार संघात राजाभाऊ ठाकूर मताधिक्क्यांनी निवडून येतील, असा विश्वास आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

## मविआ गटनेतेपदी केतन भगत

पाठिंबा दिला. लोकशाही मूल्यांना बळ देत सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्याची क्षमता त्यांच्या नेतृत्वात असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. विकासाभिमुख आणि जबाबदार राजकारणाची दिशा या निवडीमुळे अधिक स्पष्ट होईल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील यांच्यासह आघाडीचे पदाधिकारी व नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविकास आघाडी पनवेलच्या जनतेसाठी अधिक एकजुटीने आणि ताकदीने काम करेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विदयमान मालक राहुल आत्माराम पाटील व संतोष गोविंद निलधे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ६० | ५ | ०-५४-००<br>पो.ख.०-०३-००<br>०-५७-०० | ०-५३ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिदध झालेपासुन १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत

ता. ०४/०१/२०२६

मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

# दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

पिटसई विभाग ज्ञान प्रसारक मंडळाच्या अशोक ल. लोखंडे विद्यामंदिर, पिटसई येथे रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी इयत्ता दहावी १९९५-९६ च्या बॅचचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष खेळू वाजे होते. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त महादेव गोळे, माजी मुख्याध्यापक संतोष रेडीज, पर्यवेक्षक दुर्वास भोईर, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे, संस्थेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, ज्येष्ठ शिक्षक अकील मुलाणी, विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक वर्ग आणि दहावीतील विद्यार्थ्यांना भेटवस्तू व शाळेसाठी वॉटर कुलर भेट देण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष खेळू वाजे, विश्वस्त महादेव गोळे, उद्योजक प्रकाश खेडेकर, डॉ. सिद्धेश शिंदे, मंगेश मनवल यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाप्रसंगी किरण गायकर, रामनाथ वाघमारे, संदीप पातेरे, मोरेश्वर धाडवे, किशोर गायकर, लक्ष्मण सुर्वे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील जाधव, तर आभार प्रदर्शन प्रकाश खेडेकर यांनी केले.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. नामदेव काशिनाथ मोकल रा. कारावी, पोस्ट-गडब, तालुका-पेण, जिल्हा-रायगड यांनी खालील वर्णनांची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. भरत फुटरमल जैन, श्री. विक्रम गणपत घाडगे व श्री. कमलेश बस्तीमल जैन रा. बाजारपेठ, तालुका-पेण, जिल्हा-रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये तशी सविस्तर बोलणी झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा- आंबेघर, ग्रुप ग्रामपंचायत आंबेघर, मौजे धावटे येथील गट नं. ३१/२/ब/३ एकुण क्षेत्र ०-२८-०० हे.आर.चौ.मी. आकार रु. ६-९६ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी जमिन विकत घेणार यांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिध्द झाले दिवशी पासून ७ (सात) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-२८-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.

दि. ०४/०२/२०२६

सही/-
ॲड. स जय भास्कर पाटील
परमार प्लाझा, शॉप नं. १६, तळ मजला.
शिवाजी पथ, पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

**कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक 04/02/2026**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे. **कामाचे नाव** - 2026 च्या मान्सून कालावधीत चिपळूण, रत्नागिरी व कणकवली स्थानकांवर एकूण 3 ईएक्स-100 एक्स्कॅव्हेटर भाड्याने घेण्याचे काम. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-04, अंदाजित खर्च:** ₹25,87,886/-, **ईएमडी** ₹51,800/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 05/03/2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)

राजकीय फेरफटका

# आंबेपूरचे 'चित्र'। पालटणार

**शेकापचा झेंडा सन्मानाने फडकत राहणार**

| अलिबाग | कृषीवल टीम |

आंबेपूर ही स्व. नारायण नागू पाटील, स्व. प्रभाकर पाटील, स्व. मीनाक्षी पाटील यांच्या संघर्षाची, विचारांची आणि क्रांतीची भूमी आहे. कुळ कायद्याचा झेंडा ज्या मातीत रोवला गेला, ज्या भूमीतून शेतकरी, कामगार, कष्टकऱ्यांच्या हक्कांचा आवाज राज्यभर पोहोचला ती भूमी म्हणजे आंबेपूर. स्व. नारायण नागू पाटील यांनी सत्तेसाठी कधीच विचारांशी तडजोड केली नाही. अन्यायाविरोधात उभं राहणं, शोषितांना न्याय मिळवून देणं आणि माणूसपण केंद्रस्थानी ठेवणं, हीच त्यांची ओळख होती. त्यांच्या विचारांचीच परंपरा पुढे नेत माजी आ. जयंत पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाचा झेंडा सन्मानाने फडकवत ठेवला. आंबेपूरने ही निष्ठा पाहिली आहे, अनुभवली आहे, आणि म्हणूनच आज आंबेपूर गप्प बसू शकत नाही.

### 1 विचारांशी गद्दारी

या साऱ्या परंपरेच्या पार्श्वभूमीवर आज जे घडत आहे, ते आंबेपूरच्या जखमेवर मीठ चोळणारं आहे. स्वत:च्या वैयक्तिक फायद्यासाठी, सत्तेच्या सोयीसाठी भाजपच्या उमेदवाराने आपल्या विचारांना, निष्ठेला तिलांजली दिली आणि थेट भाजपमध्ये प्रवेश केला. हा प्रश्न केवळ पक्ष बदलण्याचा नाही. हा प्रश्न आहे विश्वासघाताचा. ज्यांच्या नावावर राजकारणाची सुरुवात झाली, ज्यांच्या संघर्षावर ओळख उभी राहिली, त्याच विचारांना सोडून सत्तेच्या कुबड्या पकडणं याला आंबेपूर कधीही मान्यता देणार नाही. आंबेपूरने नेहमी संघर्षाला साथ दिली, सत्तेच्या लाळघोटेपणाला नाही.कारण, आंबेपूरची माती विचारांची आहे, विक्रीची नाही. आंबेपूरच्या मातीला इतिहास आहे. या मातीत लढे रुजले आहेत, तडजोडी नाहीत. म्हणूनच आज मतदार स्पष्टपणे म्हणताना दिसत आहे. 'आमच्या भूमीत गद्दारीला जागा नाही', ज्यांनी गद्दारी करुन भाजपमध्ये प्रवेश केला, तो त्यांचा राजकीय सोयीचा निर्णय असू शकतो; पण आंबेपूरसाठी तो वैचारिक अपमान आहे, आणि हा अपमान मतदार विसरणार नाही.

### 2 निवडणूक सत्तेची नाही, तत्त्वांची

आजचा निर्णय रस्ते, कामे, आश्वासने यापुरता मर्यादित नाही. आजचा निर्णय आहे निष्ठा की स्वार्थ? विचार की सोय? परंपरा की पद? आणि या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर आंबेपूर देणार आहे. गद्दारांपेक्षा तत्त्वनिष्ठ उमेदवाराच्या पाठीशी आंबेपूर उभा राहील, असा ठाम विश्वास पूजाला आहे. आणि म्हणूनच ही निवडणूक एक स्पष्ट संदेश देणारी ठरेल. ज्यांनी विचारांचा सौदा केला, त्यांना नकार. ज्यांनी विचार जपले, त्यांना पाठिंबा.

### 3 पूजा भगत : विचारांशी एकनिष्ठ चेहरा

पूजा भगत या नावाकडे पाहताना आंबेपूरचा आत्मसन्मान जागा होतो. पूजा भगत म्हणजे केवळ उमेदवार नाही; त्या म्हणजे शेकापसोबतची निष्ठा, स्व. नारायण नागू पाटील, स्व. प्रभाकर पाटील आणि स्व. मीनाक्षी पाटील यांच्या विचारांशी अखंड बांधिलकी आहे. सत्ता कुठे आहे यापेक्षा, विचार कुठे आहेत, हे महत्त्वाचं आहे. आणि पूजासाठी म्हणूनच आज त्या मतदारांच्या आंबेपूरच्या मनाशी जोडल्या जात आहेत.



### 4 विरोधकांवरील विश्वास ढासळला

लोकप्रतिनिधीचा खरा कस निवडणुकीत नाही, तर निवडणुकीनंतर लागतो. आंबेपूरच्या बाबतीत हाच कस अपुरा ठरला, ही वस्तुस्थिती आहे. संवाद तुटला, विश्वास ढासळला. लोकप्रतिनिधी आणि जनता यांच्यातील नातं संवादावर टिकतं. पण, गेल्या काळात तो संवाद तुटलेला दिसतो. सामान्य नागरिकांचे प्रश्न ऐकून घेण्याऐवजी, सत्तेच्या चौकटीत सुरक्षित राहणं अधिक सोयीचं मानलं गेलं. परिणामी, आज भाजप आणि शिंदे गटाच्या विरोधात जनमत तयार झालं आहे. हे कुणाचं वैयक्तिक मत नाही, तर गावात उमटणारी सामूहिक भावना आहे.

### 5 पूजाचे पारडे जड

मतदारांचा पूजा यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. पूजा म्हणजे कुठल्याही राजकीय घराण्याची मक्तेदारी नाही, तर गावाशी थेट जोडलेली भूमिका आहे. त्यांनी अजून सत्ता पाहिलेली नाही, पण लोकांच्या प्रश्नांशी थेट संवाद साधलेला आहे. मोठ्या भाषणांपेक्षा, साधं बोलणं आणि काम करण्याची तयारी हीच पूजाची जमेची बाजू आहे. मतदार आता हुशार आहे, तो नावांमागे धावणार नाही, तो इतिहास पाहतो, काम पाहतो आणि मगच निर्णय घेतो. आणि म्हणूनच ही निवडणूक व्यक्तीविरोधात नाही, तर अपयशी पद्धतीविरोधात आहे.

### 6 कार्यकर्त्यांचा प्रतिसाद

आंबेपूर मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद असून पुजाला निवडून आणण्यासाठी ते दिवसरात्र काम करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. धनशक्तीविरोधातील ही लढाई जनशक्तीच जिंकणार, असा विश्वास आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे विरोधकांना चांगलाच घाम फुटला आहे.

## गद्दारीचा नाही, तर निष्ठेचा विजय होणार

### आंबेपूरचं चित्र बदलणारच

ही निवडणूक केवळ उमेदवार निवडण्याची नाही, तर दिशा ठरवण्याची आहे. जुने प्रयोग अपयशी ठरले असताना, नवा प्रयोग करण्याचं धाडस आंबेपूर दाखवेल, अशी चिन्हं स्पष्ट आहेत. आंबेपूरला आता शांततेत झाकलेली गद्दारी नको, तर त्यांना सक्रिय, ऐकणारी आणि जबाबदारी स्वीकारणारी प्रतिनिधी हवी आहे.

### विकास कागदावर, वास्तव वेगळंच

विकासाच्या घोषणा भरपूर झाल्या. फाईली फिरल्या, उद्घाटनांचे फोटो निघाले; पण सामान्य माणसाचं आयुष्य जसं होतं तसंच राहिलं. कागदावरचा विकास आणि जमिनीवरचा विकास यातली दरी वाढत गेली. आंबेपूरला आता घोषणा नको, त्यांना परिणाम हवेत.



## विलास फडके यांची प्रचारात आघाडी

**नवीन पनवेल :** शेतकरी कामगार पक्ष-महाविकास आघाडीचे आदई पंचायत समिती गणातील उमेदवार विलास फडके यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. त्यांना मतदारांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. त्यामुळे विलास फडके यांचा विजय निश्चित मानला जात आहे. शेकाप-महाविकास आघाडीचे उमेदवार विलास फडके यांनी घरोघरी मतदारांशी संवाद साधण्यावर भर दिला असून गावभेटी घेतल्या जात आहेत. त्यांचा प्रचार वेगात सुरू असून येथील मतदार त्यांचे जल्लोषात स्वागत करत आहेत. तसेच, प्रचारादरम्यान गावातील अनेक समस्या सोडवण्याचा प्रयत्न असेल, असे विलास फडके यांच्याकडून सांगण्यात आले. ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यात शेतकरी कामगार पक्ष-महाविकास आघाडीने प्रचाराचा वेग वाढवला असून उमेदवारांना जनतेचा, नागरिकांचा, मतदारांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. विलास फडके यांना ज्येष्ठ नागरिक, महिला, पुरुष आणि युवकांनी भरभरून आशीर्वाद दिले आहेत. प्रचारादरम्यान खटारा या निवडणूक चिन्हाच्या घोषणांनी संपूर्ण परिसरात दुमदुमून गेला.



## राजपुरी गटात प्रचाराचा झंझावात

**कोर्लई :** राष्ट्रवादी, शेकाप, शिवसेना (उद्धव ठाकरे) व मित्र पक्षाचे राजपुरी जिल्हा परिषद गटातील उमेदवार अजित कासार व पंचायत समिती गणातील उमेदवार अस्लम हलडे यांच्या प्रचाराचा झंझावात मतदार संघात असून ठिकठिकाणी मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नुकतेच नांदगाव तसेच मजगांव येथील कुंभारवाडा, भंडारआळी, नवीआळी-कोळीवाडा व खार मजगांव या ठिकाणी घरोघरी जाऊन काढण्यात आलेल्या प्रचार फेरीला मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मनोज भगत, मुरुड नगराध्यक्षा आराधना दांडेकर, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, आशिका ठाकूर, हसमुख जैन, अंकुश चाचे, प्रिता चौलकर, काँग्रेसचे नेते ॲड. इस्माईल घोले, जि.प. माजी सदस्य नम्रता कासार, सरपंच सेजल घुमकर, सुदेश घुमकर, सचिन पाटील, नरेश कुबल, हमिद कडू, मुस्तकिन साठे, महंमद चिपळूणकर यांच्यासह शेकाप, राष्ट्रवादी, शिवसेना (उद्धव ठाकरे) व मित्र पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते प्रचारात सहभागी झाले होते.

## चाणजे गटात 'मविआ'चा दबदबा

**उरण :** तालुक्यातील चाणजे जिल्हा परिषद गटात शेतकरी कामगार पक्ष व काँग्रेस वर्चस्व राहिले आहे. याआधी चाणजे, चिरनेर हे दोन गटच अस्तित्वात होते. त्यावेळी चाणजे जिल्हा परिषद मतदार संघातून शेकापचे दिवंगत तुकाराम हरी वाजेकर हे निवडून आले होते. तर, काँग्रेसचे दिवंगत रमेश डाऊर हे चाणजे जिल्हा परिषदेच्या सदस्यपदी निवडून येऊन अध्यक्षपदही भूषविले होते. त्यानंतर शेतकरी कामगार पक्षाचे नाना उर्फ नारायण पाटील, काँग्रेसचे चारुदत्त पाटील, शेकापचे सिताराम नाखवा, शिवसेनेचे मनोहर भोईर हे चाणजे मतदार संघातून आले होते. तेव्हापासुनच चाणजे गटात कायमच शेकाप व काँग्रेसचे प्राबल्य राहिले आहे. मात्र, मागील दोन निवडणुकांपासून या मतदारसंघात शिवसेना, शेकाप व काँग्रेस पिछाडीवर पडल्याने भाजपने या ठिकाणी शिरकाव केला होता. मात्र, यावेळी शेकाप व काँग्रेसह शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष एकत्र येत महाविकास आघाडीतून निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे शिवसेना (उद्धव ठाकरे)-महाविकास आघाडीकडून चाणजे जिल्हा परिषदेतून शेकापचे उरण पंचायत समितीचे माजी सभापती ॲड. सागर कडू यांच्या पत्नी सिद्धी कडू या निवडणूकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. त्यांच्या विरोधात भाजपने माजी जिल्हा परिषद सदस्या रीना घरत यांना उमेदवारी दिली आहे. तसेच, आम आदमी पार्टीच्या मालती भगत यांनी देखील चाणजे गटातून उमेदवारी अर्ज भरलेले आहे. मात्र, थेट लढत ही महाविकास आघाडी आणि भाजप अशीच होणार आहे. यंदाच्या निवडणूकीत शेकाप आणि काँग्रेस एकत्र आल्याने चाणजे मतदार संघात महाविकास आघाडीचा दबदबा निर्माण झाला आहे.





● रेवदंडा जिल्हा परिषद गटाचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे आणि पंचायत समितीचे उमेदवार राकेश म्हात्रे यांच्या प्रचारार्थ रेवदंडा येथे शेकाप-महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मतदारांच्या घरोघरी जाऊन वाजत गाजत प्रचार केला.

## शेतकऱ्याची डॉक्टर मुलगी रणांगणात

### डॉ. वैष्णवी ठाकूर यांना मतदारांचा कौल

| चणेरा | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना शेतकरी कामगार पक्षाच्या अधिकृत उमेदवार घोसाळे जिल्हा परीषद गटातून डॉ. वैष्णवी ठाकूर व पंचायत समिती गणातून शंकर दिवकर, तसेच न्हावे पंचायत समिती गणातून रुपाली मढवी यांच्या प्रचाराने चांगलाच वेग घेतला आहे. यादरम्यान, शेतकऱ्याची मुलगी आणि उच्चशिक्षित डॉक्टर अशी ओळख असलेल्या डॉ. वैष्णवी ठाकूर यांच्या पाठीशी येथील शेतकरी, कष्टकरी आणि सुशिक्षित तरुण मोठ्या ताकदीने उभे राहत असल्याचे चित्र आहे.



डॉ. वैष्णवी ठाकूर यांचे वडील हेमंत ठाकूर हे जिल्हा मजूर फेडरेशनचे चेअरमन असून त्यांनी शेती आणि शेतकरी जगला पाहिजे, यासाठी आयुष्यभर तन-मन-धनाने काम केले आहे. डॉ. वैष्णवी ठाकूर या उच्चशिक्षित असून पनवेल येथील नामांकित पुरोहित हॉस्पिटलमध्ये त्या डॉक्टर म्हणून सेवा बजावत आहेत. ग्रामीण भागातील आरोग्य, स्वच्छता, पाणीटंचाई आणि बेरोजगारी यांसारख्या मूलभूत प्रश्नांची त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून सखोल जाण आहे. प्रशासकीय कामकाजासाठी सुशिक्षित, संवेदनशील आणि कार्यक्षम नेतृत्वाची गरज ओळखून शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

प्रचारादरम्यान डॉ. ठाकूर यांनी, प्रत्येक गावात दर्जेदार आरोग्य सुविधा, सुशिक्षित तरुणांच्या बेरोजगारीवर ठोस उपाय, प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ पिण्याचे पाणी, शेतीविषयक प्रशासकीय अडचणी सोडवून न्याय मिळवून देणे या प्रमुख मुद्यांवर भर दिली आहे. शेकापचे 'खटारा' हे चिन्ह ग्रामीण भागातील अस्मितेचे प्रतीक मानले जाते. घोसाळे गटाच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ. वैष्णवी ठाकूर, घोसाळे पंचायत समिती शंकर दिवकर तसेच न्हावे पंचायत समीती रुपाली मढवी यांना निवडून द्या आणि त्यांना जनसेवा करण्याची संधी द्या, अशी विनंती शेतकरी कामगार पक्षाच्या तर्फे मतदारांना करण्यात आली आहे. या उमेदवारीमुळे घोसाळे जिल्हा परिषद गणात गटात शेकापची बाजू अधिक भक्कम झाली असून तरुण, शेतकरी आणि कष्टकरी वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



● कुरुळमध्ये जिल्हा परिषद चेंढरे गणाच्या उमेदवार प्रविणा घासे व पंचायत समिती गणाच्या उमेदवार प्रिया दत्ता ढवळे यांच्या प्रचाराचा झंझावात



## वडखळ विभागात शेकापला उदंड प्रतिसाद

| गडब | प्रतिनिधी |

■ **जनता महाविकास आघाडीच्या कायम पाठीशी राहील**

■ **जिल्हा परिषद गटाचे उमेदवार संजय जांभळे यांचा विश्वास**

शेतकरी कामगार पक्षाचे वडखळ जिल्हा परिषद गटातील उमेदवार संजय जांभळे व पंचायत समिती गणातील उमेदवार ललिता म्हात्रे यांना जनतेचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या प्रचारार्थ प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रचार रॅलीत उमेदवार संजय जांभळे म्हणाले की, जनतेच्या प्रश्नासाठी आम्ही सातत्याने लढा देत आहोत. वडखळ खारेपाट भागांमध्ये अनेक समस्या आहेत. सत्ताधिकाऱ्यांनी अनेक गावांमध्ये जाऊन खोटी आश्वासनं दिली. मात्र, या भागाला पाणी काय मिळाले नाही. त्यामुळे जनता आता त्यांच्या आश्वासनांना भुलणार नाही. मी जनतेचा एक सेवेकरी म्हणून जिल्हा परिषद उमेदवारी लढवत आहे. जनता अनेक प्रश्न घेऊन माझ्याकडे येत असते. त्या प्रश्नांना मार्गी लावण्याचे काम आम्ही रस्त्यावर उतरून करत आहोत. तसेच, कधीही कुठल्याही वेळेला धावून जाण्याची तयारी असते. त्यामुळे वडखळ मधली जनता माझ्या पाठीशी आहे, असे संजय जांभळे यांनी सांगितले.

**काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह | महाविकास आघाडीच्या रॅलीला तुफान प्रतिसाद**

## हर्षवर्धन सपकाळांचा दिबांच्या जन्मभूमीत एल्गार

| उरण-चिरनेर | प्रतिनिधी |

काँग्रेसचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मंगळवारी (दि.३) लोकनेते दिबांच्या जन्मभूमीत जासईमध्ये आले होते. यावेळी दिबांना आणि हुतात्म्यांना हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत आणि महाविकास आघाडीचे उमेदवार यांनी अभिवादन केले. त्यानंतर महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी काढलेल्या रॅलीला तुफान प्रतिसाद मिळाला.



महाविकास आघाडीचे जासई जिल्हा परिषद मतदार संघात डॉ. मनिष पाटील व चिरनेरमधून ॲड. अविनाश ठाकूर हे उमेदवार उभे आहेत. तर, जासई पंचायत समिती गणात निर्मला घरत, चिर्ले पंचायत समिती गणात प्रियंका मढवी, चिरनेर पंचायत समिती गणात कविता पाटील, व आवरे पंचायत समिती गणात प्रारंभी गावंड हे उमेदवार लढत आहेत. त्यांच्या प्रचारार्थ दिबांची जन्मभुमी जासई येथे मंगळवारी प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यादरम्यान जासई, दिघोडे व कोप्रोली येथील प्रचार रॅलीला जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, रायगडमध्ये काँग्रेस पक्ष किंग मेकरच्या भूमिकेत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांच्या नावासाठी काँग्रेस पक्ष सुरुवातीपासून आग्रही आहे. केंद्र आणि राज्य सरकार उदासीन आहे; परंतु, दिबांचे नाव दिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांमधील उत्साह वाखाणण्याजोगा आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार बहुमतांनी निवडून येतील, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. तसेच, महेंद्र घरत यांनी देखील जासईसह उरण तालुक्यातील महाविकास आघाडीचे सर्व उमेदवार बहुमतांनी निवडून येतील, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, श्रद्धा ठाकूर, प्रभारी डॉमनिक डिमेलो, माजी जिल्हाध्यक्ष आर. सी. घरत, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, कामगार नेत्या श्रुती म्हात्रे, उपाध्यक्ष रामनाथ पंडित, जयवंत पाटील, संजय ठाकूर, प्रेमनाथ म्हात्रे, महिला अध्यक्षा रेखा घरत, शेकापचे नरेश घरत, संतोष म्हात्रे, सरपंच संतोष घरत, कामगार नेते संतोष घरत, कामगार नेते रवी घरत, बबन कांबळे आदी महाविकास आघाडीचे मान्यवर उपस्थित होते.

# हिंदुत्वातील मारामाऱ्या

गेला आठवडाभर उत्तर प्रदेशात भाजपच्या सत्तेविरुध्द भाजपशी संबंधित संघटनांचीच आंदोलने चालू होती. यामध्ये योगी तुझसे बैर नही, मोदी तेरी खैर नही अशा घोषणाही दिल्या गेल्या. मोदी सरकारचा निषेध केला गेला. भाजपच्या ठिकठिकाणच्या कार्यालयांमध्ये घुसून निदर्शनेकेली गेली. हे सर्व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अर्थात यूजीसीच्या नवीन नियमांसंदर्भात होते. दलित व मागास जातीच्या विद्यार्थ्यांसोबत भेदभाव करण्याला कडक शिक्षा करण्यासंदर्भात हे नियम होते. सात वर्षांपूर्वी म्हणजे २२ मे २०१९ ला पायल तडवी नावाच्या डॉक्टर मुलीने नायर रुग्णालयात पदव्युत्तर शिक्षण घेत असताना आत्महत्या केली होती. पायल ही मुस्लिम भील तडवी या आदिवासी व अतिमागास समाजातील दुर्मीळ महिला डॉक्टर होती. तिच्या वरिष्ठ सहकारी डॉक्टर मुली पायलला तिच्या जातीवरून सातत्याने हिणवत असत व त्यामुळेच तिने शेवटी आत्महत्या केली. तो खटला अजूनही चालू आहे. त्यापूर्वी २०१६ मधील रोहित वेमुला या दलित मुलाने हैदराबादच्या विद्यापीठात जातीय छळाला कंटाळून अशीच आत्महत्या केली होती. रोहितच्या आईने या संदर्भात न्यायालयात खटला दाखल केला असून विद्यापीठांमधील या भेदभावाबाबत कडक पावले उचलण्याची मागणी केली आहे. पायलची आईही या खटल्यात सहयाचिकाकर्ती म्हणून नंतर दाखल झाली. त्यांच्या मागणीनुसार कडक नियम करावेत असे न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाला आदेश दिले. त्याबरहुकुम आयोगाने जे नियम तयार केले त्यावरूनच उत्तर प्रदेशमध्ये विद्यार्थ्यांचा उद्रेक झाला. या नव्या नियमांमध्ये दलित व आदिवासींच्या जोडीने ओबीसी किंवा इतर मागास जातीच्या विद्यार्थ्यांसोबत भेदभाव करण्याला गुन्हा ठरवण्यात येणार आहे. शिवाय यासाठी भेदभावाची नवी व्याख्या करण्यात आली असून प्रत्येक महाविद्यालय व विद्यापीठ इत्यादींमध्ये एक समानता समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. भेदभाव म्हणजे काय हे ही समिती ठरवेल असे निश्चित करण्यात आले आहे. मात्र सवर्ण विद्यार्थ्यांना त्रास देण्यासाठी या नव्या तरतुदींचा वापर होईल असा आंदोलकांचा दावा आहे.

## जाती–जातींमधील तेढ

एखाद्या कॉलेजमध्ये जातीय छळाची किंवा भेदभावाची तक्रार घेऊन विद्यार्थी आला तर त्याला समानता समितीकडे पाठवले जायचे आहे. संबंधित प्रकरण भेदभावाचे आहे की नाही याची शहानिशा स्थानिक परिस्थितीच्या आधारे ही समिती करील. उदाहरणार्थ कँटिनमध्ये आपल्याला वेगळे बसायला लावले जाते किंवा आपल्यासोबत जेवायला मुले तयार नसतात असा आरोप समजा एखाद्याने केला तर स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यातील वस्तुस्थिती ही समिती शोधून काढेल. त्यात तथ्य आढळले तर भेदभाव करणाऱ्यांना निलंबित करण्यासारख्या शिक्षाही करू शकेल. या समितीत दलित, आदिवासी व इतर मागास समाचे प्रतिनिधी असावेत असे निर्देश यूजीसीने दिले आहेत. मात्र यांमध्ये उच्च वर्णीय समाजाचा एकही प्रतिनिधी नसल्याने त्यांच्याविरुध्द आकसाने कारवाई होईल अशी भीती व्यक्त करून उत्तर प्रदेशातील आंदोलनाला सुरुवात झाली. नंतर हा सर्व ब्राह्मण व वरिष्ठ जातींना छळण्याचा कटच असल्याचे म्हटले जाऊ लागले. तसेच एखाद्याने खोटी तक्रार दिली तर त्याविरुध्द कारवाई करण्याची या नवीन नियमांमध्ये कोणतीही तरतूद नाही याबद्दलही आंदोलकांनी आक्षेप घेतला व वातावरण पेटवण्यात आले. यातून मग गोष्टी एट्रॉसिटी एक्टकडे वळल्या व या दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्याखाली खोट्या केसेस होत असल्याचा ओरडा करून तोच रद्द करण्याची मागणी पुढे आली. मधल्या काळात उत्तर प्रदेशात आंदोलन चिघळण्याचा रंग दिसू लागला. मग प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. तिथे न्यायालयाने नव्या नियमांना स्थगिती दिल्याने हे आंदोलन तूर्तास थांबले आहे. पण उत्तर प्रदेशात सवर्ण आणि दलित तसेच ओबीसी यांच्यात किती तेढ आहे त्याचे व्हायचे ते दर्शन होऊन गेले आहे. यातून तुफान राजकारणही झाले असून योगी आदित्यनाथ यांनीच या आंदोलनाला फूस दिली व मोदी तसेच अमित शाह यांच्याविरुध्द ताकदीचे प्रदर्शन घडवून आणले असे बोलले जाते. योगींचे पंख कापण्यासाठी अमित शाह खूप दिवसांपासून संधी शोधत आहेत. त्यासाठीच तिथे मौर्य यांना उपमुख्यमंत्री करण्यात आले आहे. आता आंदोलनाचे निमित्त करून योगींचे पाय कापण्याचे वा शिवराजसिंग चौहान यांच्याप्रमाणे त्यांना केंद्रात आणून किरकोळ पद देऊन बसवून ठेवण्याचा प्रयोग केला जाण्याची शक्यता आहे.

## महाराष्ट्रातही हेच होईल

यातील राजकारण काय वळण घेईल ते घेईल. पण या निमित्ताने हिंदुत्वाचा प्रकल्प आतून किती पोकळ आहे याचा प्रत्यय आला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये योगी आदित्यनाथ यांनी बटेंगे तो कटेंगे अशी घोषणा दिली होती. मुसलमानांच्या विरोधात लढण्यासाठी सर्व हिंदूंनी एक राहायला हवे असा त्यामागचा गर्भित अर्थ होता. नंतर महाराष्ट्रात येऊनही त्यांनी ती घोषणा दिली व मराठा आरक्षण आंदोलनाच्या निमित्ताने फूट पाडू देऊ नका असे आवाहन केले. पण याच योगींच्या राज्यात स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्यांमध्ये किती दुफळ्या पडल्या आहेत हे यातून स्पष्ट झाले. तसेही लोकसभेला भाजपला सर्वाधिक दणका उत्तर प्रदेशातच बसला होता. तिथे खुद्द अयोध्येतही समाजवादी पक्षाचा व तोही मागास उमेदवार खासदार म्हणून निवडून आला होता. योगी हे ठाकूर आहेत. त्यांना ब्राह्मण तसेच इतर मागासातील अनेक जातीचा विरोध आहे. भाजपला कुर्मी समाजाच्या अनुप्रिया पटेल वगैरेंना सोबत ठेवावे लागत आहे. याखेरीज अनेक छोट्या जातींचे पक्षही बेटकुळ्या काढून दाखवत असतात. ताजे आंदोलन हे मुख्यतः ब्राह्मण समाजाचे होते. त्यातील अलंकार अग्निहोत्री नावाच्या एका शहर दंडाधिकाऱ्याने तर या यूजीसी नियमांच्या विरोधात राजीनामा देऊन आंदोलनात उडी घेतली. त्यामुळे मंडल आयोगाला विरोध करणाऱ्या अभाविपच्या काही विद्यार्थ्यांनी १९९० च्या दशकात स्वतःला जाळून घेण्याच्या केलेल्या प्रयत्नांची आठवण झाली. त्याही वेळी मंडलला विरोध करण्यात उत्तरेतले ब्राह्मण आघाडीवर होते. आताही ठिकठिकाणी त्यांनीच आंदोलने केली. परवा बनारस हिंदू विद्यापीठात जातीयवाचक उल्लेखावरून विद्यार्थ्यांच्या दोन गटांमध्ये हाणामाऱ्या झाल्या. त्यातही सवर्णांनीच दलितांना मारहाण केल्याचे दिसते. काही ठिकाणी आंदोलनांमध्ये मोदी हे घाची किंवा तेली जातीचे असल्याचा उल्लेख झाला. ते इतर मागास असल्यानेच सवर्णांना छळत आहेत असा तर्क काही जणांनी लावला. थोडक्यात हिंदूंमध्ये जातपात नसते, भाजप जातीयतेच्या पलिकडे आहे वगैरे सांगणाऱ्यांची तोंडे या आंदोलनाने चांगलीच फुटली आहेत. सध्या उत्तर प्रदेशात रा.स्व. संघ शताब्दीचे कार्यक्रम चालू आहेत. तेही काही ठिकाणी आंदोलकांनी बंद पाडल्याचे प्रसंग घडले. एकूण हे आंदोलन आणखी चिघळले असते. पण सर्वोच्च न्यायालयच भाजपच्या मदतीला धावून आले असे दिसते. ते काहीही असले तरी या निमित्ताने स्वतःला सनातनी म्हणवून घेणाऱ्या उच्चवर्णीय ब्राह्मणांचा खरा चेहरा उघड झाला असून हिंदू सगळे एक हा नारा किती बोगस आहे ते स्पष्ट झाले. येत्या काळात उत्तरेतच नव्हे तर महाराष्ट्रातही अशा दुफळ्या दिसल्या तर आश्चर्य वाटू नये.

विचार

# लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना सुरुंग

***लोकशाही व्यवस्थेचा कणा म्हणजे मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया; मात्र प्रत्यक्षात ही प्रक्रिया अनेक ठिकाणी दूषित होताना दिसते. विशेषतः महापालिका निवडणुकांमध्ये मतांची खरेदी-विक्री ही एक गंभीर आणि चिंताजनक समस्या बनली आहे. पैशाच्या, वस्तूंच्या किंवा इतर प्रलोभनांच्या आधारे मतदारांचे मत विकत घेण्याची प्रथा लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांनाच सुरुंग लावणारी आहे.***

**भागा वरखडे**

महाराष्ट्रात महापालिकांच्या निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर नागरी भागाच्या विकासाच्या किल्ल्या कुणाच्या हातात द्यायच्या, याचा निर्णय मतदारांनी घेतल्याचे दिसले; परंतु सत्तेत आलेल्या सर्वच राजकीय पक्षांनी निवडणूक प्रक्रियेला लावलेले वळण अतिशय गंभीर आहे. सत्तराव्या दशकात मतदारांना पैसे वाटण्याची कुप्रथा सुरू झाली. सुरुवातीची तीस वर्षे ही प्रथा ठराविक लोकांपुरती आणि ठराविक भागांपुरती मर्यादित होती; परंतु अलिकडच्या दोन दशकांमध्ये या प्रथेचे वेगाने सार्वत्रिकीकरण झाले आहे. लोकशाही वस्त्रहीन अवस्थेत दीनवाणी उभी असल्याचे चित्र मतांच्या बाजारातून व्यक्त होत आहे. उच्चभ्रू सोसायट्यांमध्येही मतांचा भाव होतो, हे आता उघड सत्य आहे.

मतासाठी शंभर रुपये ते पाचशे रुपये भाव फुटतो, तेव्हा मध्यमवर्ग त्यापासून दूर राहतो; परंतु आता मतासाठी एक हजारांपासून पन्नास हजारांपर्यंत पैसे दिले जातात, तेव्हा सर्वांच्याच तोंडाला पाणी सुटते. शिवाय आपण पैसे घेतले नाही, तरी संबंधित व्यक्ती निवडून आल्यानंतर गैरव्यवहार करणार, निकृष्ट कामे करणार; त्यामुळे आपण तरी अपवाद का रहायचे, असा विचार करणाऱ्यांचे प्रमाण दुर्दैवाने वाढते आहे. महापालिका ही शहरांच्या प्रशासनाची सर्वात म हत्त्वाची संस्था आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वाहतूक यासारख्या मूलभूत नागरी सुविधा महापालिकेच्या अखत्यारीत येतात. त्यामुळे महापालिकेतील लोकप्रतिनिधी हे सक्षम, प्रामाणिक आणि लोकहिताची जाण असलेले असणे अपेक्षित असते; परंतु उमेदवार मतांची खरेदी करून निवडून येतात, तेव्हा त्यांचा मुख्य उद्देश जनतेची सेवा नसून निवडणुकीत खर्च केलेला पैसा परत मिळवणे हाच असतो. मतांची खरेदी म्हणजे निवडणुकीच्या काळात मतदारांना रोख रक्कम, दारू, साड्या, मोबाईल फोन, किराणा साहित्य, जेवणाची व्यवस्था किंवा नोकरी, कामाचे आमिष दाखवून मत मिळवणे. काही वेळा ही खरेदी उघडपणे केली जाते, तर अनेकदा ती गुप्तपणे केली जाते. झोपडपट्ट्या, गरीब वस्त्या, बेरोजगार तरुण, असंघटित कामगार यांना या प्रकारे लक्ष्य केले जाते, कारण आर्थिक अडचणींमुळे ते अशा प्रलोभनांना बळी पडण्याची शक्यता अधिक असते. आता तर सोसायट्यांनी जी कामे स्वतःच्या खर्चातून करायची असतात, तीही उमेदवारांकडून करून घेतली जातात. उमेदवार महापालिकेच्या खर्चातून ती कामे न करता स्वतःच्या खर्चातून करतात. महापालिका निवडणुकांसाठी उमेदवाराला असलेल्या खर्चाची मर्यादा आणि मतदारांच्या आमिषांवर होणारा खर्च पाहता मर्यादा ही नावालाच आहे, हे स्पष्ट होते. सर्वपक्षीय नेते आणि प्रशासनाला निवडणुकीसाठी होणारा हा कोट्यवधी रुपयांचा खर्च माहीत असतो. नगरसेवकपदाच्या निवडणुकीसाठी २०-२५ कोटी रुपये खर्च येत असतील, तर आपली लोकशाही भलतीच महाग झाली आहे आणि सामान्य नागरिकांना आता लोकशाहीच्या मंदिरात प्रवेश नाही, हे स्पष्ट होते.

या समस्येमागे अनेक कारणे आहेत. वाढती महागाई, बेरोजगारी, दारिद्र्य आणि शिक्षणाचा अभाव ही प्रमुख कारणे मानली जातात. अनेक म तदारांना मतदानाचे खरे महत्त्व आणि त्याचे दूरगामी परिणाम समजत नाहीत. त्यांच्यासाठी निवडणूक म्हणजे एकदाच मिळणारी आर्थिक मदत किंवा वस्तू अशीच धारणा तयार झाली आहे. दुसरीकडे, राजकीय पक्ष आणि उमेदवारही याच मानसिकतेचा फायदा घेतात. निवडणूक जिंकण्यासाठी ते मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करतात आणि मत विकत घेणे हे त्यांना सोपे वाटते. भारतीय निवडणूक कायद्यानुसार लाच देणे किंवा घेणे हा गुन्हा आहे. निवडणूक आयोगाने आचारसंहिता लागू करून रोख रक्कम, मौल्यवान वस्तू आणि प्रलोभनांवर बंदी घातली आहे; तरीही प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये अनेक त्रुटी दिसतात. निवडणूककाळात मोठ्या प्रमाणावर पैसा जप्त होतो; पण त्यानंतर दोषींवर क्वचितच कठोर कारवाई होते. यामुळे उमेदवारांम ध्ये कायद्याची भीती उरत नाही. अनेकदा लाखो रुपयांची रक्कम जप्त केली जाते, पुढे तिचे काय होते, हे कळत नाही. निवडणुकीच्या काळात अशी रक्कम बाळगणाऱ्यांवर कठोर कारवाई झाल्याचे ऐकिवात नाही. मतांचा भाव ऐकून एवढे पैसे कुठून येतात, 'ईडी', 'सीबीआय', प्राप्तिकर विभागासारख्या यंत्रणा निवडणुकीच्या काळात झोपलेल्या असतात का, असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात.

अहिल्यानगरमध्ये मतदानाच्या आधी एका मताला सात हजार रुपये भाव निघाला, पिंपरी-चिंचवडमध्ये तर एकेका मतासाठी तब्बल १५ हजार रुपये वाटण्यात आले. छत्रपती संभाजीनगर एका प्रभागात तर एका मताला पन्नास हजार रुपये देण्यात आल्याचे स्वयंसेवी संस्थांना आढळले असेल, तर आपली लोकशाही कुठे चालली आहे, असा प्रश्न पडतो. मतदारांना देवदर्शनाला घेऊन जाणे, पुण्यात वॉशिंग मशीनचे वाटप करणे असे प्रकार घडले. आता जिल्हा परिषद निवडणूक जाहीर होण्याअगोदर शिरूर तालुक्यातील काही गटांमध्ये मतदारांची थेट उज्जैन यात्रा घडवण्यात आली. त्याचे फलक गावोगाव लागले होते. असे असताना आचारसंहिता लागू होण्याच्या आधी हे घडल्यामुळे यंत्रणा डोळ्यावर कातडे ओढून बसली होती. मतांची अशा प्रकारची खरेदी लोकशाहीवर गंभीर परिणाम घडवते. प्रथम, प्रामाणिक आणि सक्षम उमेदवार मागे पडतात, कारण त्यांच्याकडे प्रचंड पैसा नसतो. दुसरे म्हणजे, निवडून आलेले प्रतिनिधी जनतेला जबाबदार राहत नाहीत. कारण त्यांनी मत विकत घेतलेले असते. तिसरे म्हणजे, भ्रष्टाचार वाढतो. निवडणुकीत खर्च केलेला पैसा वसूल करण्यासाठी गैरमार्गांचा अवलंब केला जातो. कंत्राटांमध्ये घोटाळे होतात आणि विकासकामांची गुणवत्ता खालावते. आता तर विकासकामे न करताच पैसे काढण्याचे प्रकार घडत आहेत. परिणामी सामान्य नागरिकांचे नुकसान होते.

लोकशाही प्रक्रियेत केंद्र आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणे महापालिका निवडणुकाही अत्यंत महत्त्वाच्या आहेत. शहरांच्या कारभाराशी थेट संबंधित असलेल्या या निवडणुकांमध्ये नागरिकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो; मात्र अलीकडच्या काळात महापालिका निवडणुकांमध्ये भेटवस्तूंचे वाटप ही एक गंभीर समस्या बनली आहे. ही प्रथा केवळ कायद्याला आव्हान देणारी नसून लोकशाही मूल्यांनाही धक्का देणारी आहे. महापालिका निवडणुकांमध्ये उमेदवार किंवा राजकीय पक्ष मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारच्या भेटवस्तू वाटतात. यामध्ये साडी, भांडी, किराणा साहित्य, मोबाईल फोन, रोख रक्कम, कूपन्स, तसेच काही वेळा मद्य किंवा जेवणाची व्यवस्था यांचा समावेश असतो. या भेटवस्तूंचा उद्देश मतदारांच्या मतांवर प्रभाव टाकणे हाच असतो. लोकशाही व्यवस्थेत मतदाराने उमेदवाराची कार्यक्षमता, प्रामाणिकपणा, विकासाचे धोरण आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी या आधारांवर मतदान करणे अपेक्षित असते; मात्र भेटवस्तूंच्या वाटपामुळे निवडणूक प्रक्रिया विकृत होते. योग्य आणि सक्षम उमेदवाराऐवजी अधिक खर्च करणारा उमेदवार निवडून येण्याची शक्यता वाढते. याचा थेट परिणाम प्रशासनाच्या गुणवत्तेवर होतो. भेटवस्तूंचे वाटप हे कायद्याने गुन्हा मानले गेले आहे. निवडणूक लढवण्यासाठी प्रचंड पैसा खर्च होतो आणि निवडून आल्यानंतर हा खर्च वसूल करण्याची प्रवृत्ती वाढते. याचा फटका सामान्य नागरिकांना बसतो, कारण विकासकामांची गुणवत्ता घसरते आणि सार्वजनिक निधीचा गैरवापर होतो.

या समस्येचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे लोकांचा लोकशाहीवरील विश्वास कमी होणे. सगळेच नेते पैसे देऊन निवडून येतात अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण होते. त्यामुळे अनेक सुशिक्षित नागरिक मतदानाकडे पाठ फिरवतात. मतदानाची टक्केवारी कमी होते आणि लोकशाही अधिक कमकुवत होते. मतांची खरेदी रोखण्यासाठी अनेक पातळ्यांवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, मतदारांमध्ये जनजागृती करणे महत्त्वाचे आहे. शिक्षणसंस्था, स्वयंसेवी संस्था, माध्यमे आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी यामध्ये सक्रिय भूमिका बजावली पाहिजे. दुसरे म्हणजे, निवडणूक आयोगाने अधिक कठोर आणि प्रभावी कारवाई केली पाहिजे. दोषी उमेदवारांवर तात्काळ कारवाई, निवडणूक रद्द करणे आणि अपात्र ठरवणे यासारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. तिसरे म्हणजे, राजकीय पक्षांनी आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. स्वच्छ प्रतिमेच्या उमेदवारांना संधी देणे, निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि अंतर्गत शिस्त पाळणे आवश्यक आहे. चौथे म्हणजे, नागरिकांनी स्वतःचा स्वाभिमान जपला पाहिजे. क्षणिक फायद्यासाठी मत विकणे म्हणजे स्वतःच्या शहराच्या भवितव्याशी तडजोड करणे हे प्रत्येक मतदाराने ओळखले पाहिजे. महापालिका निवडणुकीत मतांची खरेदी ही लोकशाहीसाठी अत्यंत घातक प्रथा आहे. ती थांबवणे केवळ सरकार किंवा निवडणूक आयोगाचे काम नाही, तर प्रत्येक जागरूक नागरिकाची जबाबदारी आहे. स्वच्छ, पारदर्शक आणि नैतिक निवडणूक प्रक्रिया राबवली गेली, तरच खऱ्या अर्थाने लोकशाही मजबूत होईल आणि शहरांचा सर्वांगीण विकास साध्य होईल.

# राजकारण लय वंगाळ हाय!



**राकेश लोहार**

''राजकारण लय वंगाळ हाय राव, कुणी याच्या नादी लागू नका,'' हे अजित पवार यांचे वाक्य आज महाराष्ट्रातील असंख्य कार्यकर्त्यांच्या मनात ठसठशीतपणे घुमत आहे. मागील काही दिवसांत राज्यात घडलेल्या राजकीय हालचालींनी सामान्य कार्यकर्ता, निष्ठावान मतदार आणि गावखेड्यातील पक्षाशी भावनिक नाळ जोडून असलेली माणसं अक्षरशः अस्वस्थ झाली आहेत. कारण, प्रश्न केवळ सत्तेचा नाही; प्रश्न आहे संवेदनांचा, परंपरांचा आणि राजकारणातील शिष्टाचारांचा.

सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली, हा प्रसंग काहींना अभिमानाचा वाटू शकतो. नेतृत्वाची परंपरा पुढे नेण्यास कोणाचीही हरकत नसते. पण, या सगळ्या प्रक्रियेत दिसलेली घाई आणि गडबड कार्यकर्त्यांच्या मनाला चटका लावून गेली. एवढी कसली घाई होती? कोण कुठे पळून जात नव्हतं. महाराष्ट्र तिथेच होता, जनतेचा पाठिंबा तसाच होता. मग एवढा उतावळेपणा का?

हिंदू संस्कृतीनुसार तेरा दिवस कोणतेही शुभकार्य टाळले जाते. कमीत कमी दहावे होईपर्यंत थांबणे, ही अपेक्षा सामान्य माणसाची होती. गावागावात कार्यकर्त्यांनी तीन-तीन, चार-चार दिवस दुकाने बंद ठेवून दुखवटा पाळला. भावनिक निष्ठेने ते शांत बसले. पण, वरच्या पातळीवर मात्र राजकारणाचे चक्र वेगाने फिरत राहिले. हा तफावत कार्यकर्त्यांना नक्कीच खटकला आहे. सामान्य कार्यकर्त्याची नाळ पक्षाशी विचारांपेक्षा भावनेने जोडलेली असते. त्याने वर्षानुवर्षे आपल्या नेत्यांवर विश्वास ठेवला, आदेश पाळले, लोकांमध्ये पक्षाची बाजू मांडली. ग्रामीण भागात तर ही निष्ठा अधिक तीव्र असते. पण, मागील काही दिवसांत जे चित्र दिसले, त्याने त्याच कार्यकर्त्याच्या मनात प्रश्न निर्माण केले. ''आपल्या भावना इतक्या स्वस्त आहेत का?'' असा सवाल तो स्वतःलाच विचारतो आहे. कारण, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पाळेमुळे ग्रामीण भागात अधिक खोलवर रुजली आहेत. कोण आमदार पळून चालला होता का? जरी एखादा गेला असता, तरी जनतेनेच त्याला जाब विचारला असता, असा विश्वास कार्यकर्त्यांना आहे. पण या शक्यतेच्या नावाखाली घाईघाईत घेतलेले निर्णय कार्यकर्त्यांच्या जखमेवर मीठ चोळणारे ठरले. राजकारणात रणनीती असते, पण संवेदना असणेही तितकेच महत्त्वाचे असते, हे जणू विसरले गेले.

आज गावोगावी चहाच्या टपऱ्यांवर, शेताच्या बांधावर, बाजारपेठेत एकच चर्चा आहे-राजकारणात माणुसकी उरली आहे का? महाराष्ट्राच्या राजकारणात सुरु असलेले राजकारण बघितल्यावर, 'नटसम्राट'मधील संवाद अनेकांच्या ओठांवर येतो''राजकारणी म्हणून तुम्ही भिकारडे आहातच, पण माणूस म्हणूनही नीच आहात.'' हा संताप केवळ शब्दांपुरता नाही; तो मनात खोलवर साचलेला आहे. अजित पवार यांनी अनेक वर्षांत कमावलेली कार्यकर्त्यांची फौज, त्यांचा विश्वास, त्यांची भावनिक गुंतवणूकहे सर्व एका दिवसात डळमळीत झाल्याची भावना कार्यकर्त्यांत आहे. त्याला कारण, सध्याचे सुरू असलेले राजकारणच आहे.

उपमुख्यमंत्रीपद कोणाला मिळावे, यावर सामान्य कार्यकर्त्यांची नाराजी नाही. पण, निर्णयाची वेळ आणि पद्धत यावर त्यांचा आक्षेप आहे. दहा दिवस थांबले असते, तर कार्यकर्त्यांच्या भावनांचा सन्मान झाला असता, अशी चर्चा आहे. राजकारण हे केवळ सत्तेचे गणित नसते; ते विश्वासाचे समीकरण असते. हा विश्वास तुटायला वेळ लागत नाही. आज त्याच विश्वासाला तडा जात असल्याची जाणीव अनेकांना होते आहे. राजकारणात निर्णय घ्यावेच लागतात, परिस्थितीनुसार पावले उचलावी लागतात, हे कार्यकर्ते समजून घेतात. पण त्याच वेळी, दुःखाच्या क्षणी थोडी संवेदनशीलता दाखवणे, परंपरांचा मान राखणे आणि कार्यकर्त्यांच्या भावनांना किंमत देणे, हेही तेवढेच आवश्यक असते. नेते मोठे होतात ते केवळ पदांमुळे नाही, तर अशा छोट्या कृतींमुळे, ज्या सामान्य माणसाच्या मनात घर करतात.

शेवटी राजकारणात पदं येतात-जातात, सत्ता बदलते, चेहरे बदलतात. पण कार्यकर्त्याचे प्रेम, त्याची निष्ठा आणि त्याच्या मनातील आदर एकदा कमी झाला, तर तो पुन्हा पूर्वीसारखा निर्माण करणे फार कठीण असते. कदाचित आज अनेक कार्यकर्ते मनातल्या मनात एकच गोष्ट म्हणत असतील- ''नेतृत्व मोठं असतं, पण माणुसकी त्याहून मोठी असते. आणि तीच जर हरवली, तर उरतं ते फक्त राजकारण आणि ते खरंच लय वंगाळ असतं.'' कार्यकर्त्यांचा राजकारणातील मूड निघून गेलाय, उत्साह कमी झालाय, आणि मनात एक प्रकारचा वीट साचलाय. महाराष्ट्रातील जनता भावनिक आहे, निष्ठावान आहे, पण तिला संवेदनशीलतेची अपेक्षा आहे. राजकारणातील ही घाई, हा उतावळेपणा आणि भावनांकडे केलेले दुर्लक्ष, हे सर्व कार्यकर्त्यांच्या मनात खोलवर नाराजी निर्माण करत आहे. आणि म्हणूनच, आज अनेकांना अजित पवारांचे ते वाक्य पुन्हा पुन्हा आठवते- राजकारण लय वंगाळ हाय.

लोकसंसद

## पाकिस्तानचा 'शेखचिल्ली' निर्णय

येत्या ७ फेब्रुवारीला मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर भारत विरुद्ध अमेरिका या दोन संघांदरम्यान रंगणाऱ्या सामन्याने २०२६ च्या टी-२० आयसीसी विश्वचषकाचा श्रीगणेशा होत आहे. मात्र पाकिस्तानने भारत विद्वेषाचे खतपाणी घातलेल्या बांगलादेशच्या दुराग्रही भूमिकेमुळे या स्पर्धेला अपशकुनाचे ग्रहण लागले. बांगलादेशने खेळाडूंच्या सुरक्षेच्या नावाखाली भारतात खेळण्यास नकार देऊन त्यांचे सामने श्रीलंकेत खेळवण्याची मागणी केल्यानंतर आयसीसीने ही मागणी फेटाळून तर लावलीच, पण कठोर कारवाई करत बांगलादेशला या स्पर्धेतून काढून टाकले. आयसीसीच्या या निर्णयाचा धक्का बांगलादेशपेक्षाही पाकिस्तानला अधिक बसला. मग त्यांनी बांगलादेशला पाठिंबा म्हणून संपूर्ण स्पर्धेवर बहिष्कार घालण्याचा पवित्रा घेतला. त्यातून आयसीसीकडून भविष्यात होणारी कठोर कारवाई आणि मोठे आर्थिक नुकसान लक्षात आल्यानंतर 'आम्ही या स्पर्धेत खेळू, पण भारताविरुद्ध खेळणार नाही' अशी ताठर भूमिका त्यांनी घेतली आहे. खरे तर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील एका सामन्यामुळे प्रक्षेपणाचे हक्क, जाहिराती, प्रायोजकत्व, तिकीट विक्री, कायदेशीर सट्टेबाजी यासारख्या इतर गोष्टींमुळे अंदाजे ४५०० कोटी रुपयांची उलाढाल होते. त्यामुळे हा सामना झालाच नाही तर सर्वाधिक आर्थिक नुकसान पाकिस्तानचेच होईल. अशावेळी झाडाच्या फांदीवर बसलेल्या आणि तीच फांदी कापून खाली पडलेल्या 'शेखचिल्ली'ची आठवण झाल्यावाचून राहवत नाही.

**–प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# फेसबुकचा वाढदिवस!

विज्ञानामुळे जग जवळ आले आहे असे लहानपणी ऐकले होते ; पण याची खरी प्रचिती फेसबूक या सोशल नेटवर्किंग साईटमुळेच आली. फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटला आज म्हणजे ४ फेब्रुवारी रोजी २२ वर्ष पूर्ण झाली. याचाच अर्थ आज फेसबुकचा बाविसावा वाढदिवस आहे. आज जगभरात फेसबुक वापरणाऱ्यांची संख्या तीनशे कोटीहून अधिक आहे. अमेरिकेत माहिती गोळा करणाऱ्या पुस्तकाला फेसबुक असे म्हंटले जाते. अमेरिकेत जेंव्हा डिजिटल युगाची सुरुवात झाली तेंव्हा ही माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचे आव्हान मार्क झुकरबर्ग या तरुण मुलाने स्वीकारले. हार्वर्ड विद्यापीठात शिकत असलेल्या मार्कने डस्टिन मॉस्कोविट्स, अँड्र्यू आर्डो सर्विन आणि ख्रिस ह्युजेस या आपल्या मित्रांच्या सोबतीने फेसबुकची स्थापना केली. ४ फेब्रुवारी २००४ रोजी मार्कने हार्वर्ड विद्यापीठाच्या वसतिगृहात फेसबुक सुरू केले. अल्पावधीतच या सोशल नेटवर्किंग साईटने तरुणांना अक्षरशः वेड लावले. फेसबुक आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेटवर्किंग साईट बनली आहे. २२ वर्षापूर्वी मार्कने जे रोपटे लावले त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

जगातील जवळपास पंधरा देशात फेसबुकची कार्यालये आहेत. फेसबुकची आज पाच हजार कोटींची उलाढाल आहे. फेसबुकला मिळणाऱ्या जाहिरातींमुळे फेसबुकला विनामूल्य सेवा देणे शक्य झाले आहे. १८ मे २०१२ ला फेसबुकने आपले शेअर विकायला काढले या शेअर्सने बाजारात धुमाकूळ घातला. या शेअर्समुळे फेसबुकला कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला. आज फेसबुकने व्हॉट्सअॅप आणि इंस्टाग्राम या नेटवर्किंग साईटसना देखील आपल्या कवेत घेतले आहे. फेसबुकची वाढती लोकप्रियता पाहून गुगलने फेसबुक विकत घेण्याचा प्रस्ताव मार्क झुकरबर्ग समोर ठेवला मात्र त्याने तो फेटाळून लावला. इंटरनेट विश्वात गुगल नंतर सर्वात जास्त विजिट होणारी वेबसाईट फेसबुक हीच आहे. आजच्या युगात फेसबुक हा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. फेसबुक निर्मितीचे एकमेकांशी संवाद साधने, मतप्रदर्शन आणि देवाणघेवाण हे मुख्य उद्देश होते व आजही कायम आहेत. यासोबतच नवनवीन फीचर्स फेसबुक वापरकर्त्यांसाठी आणते. फेसबुकने आता वापरकर्त्यांसाठी ए आय ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे वापरकर्ते ए आय च्या मदतीने आपल्याला हवी ती माहिती क्षणार्धात मिळवू शकतात. तसेच ए आय चा वापर करून आपले फोटो, व्हिडिओ, रिल्स, व्हिडिओ शेअर करू शकतात. फेसबुकवर दररोज अब्जावधी फोटो, व्हिडिओ आणि रिल्स शेअर केले जातात. तसेच फेसबुकवर दररोज अब्जावधी पोस्टचा पाऊस पडतो. फेसबुक आज अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. फेसबुकवर एका वापर कर्त्याचे सरासरी पाचशे मित्र आहेत तो दररोज दहा लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा स्वीकारतो फेसबुकवर आज इतके युजर्स आहेत की त्या सर्वांचे एक कुटुंब करायचे म्हटलं तर त्या कुटुंबाची लोकसंख्या जगातील कोणत्याही देशातील लोकसंख्येपेक्षा अधिक असेल. हे विश्वची माझे घर.... या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वाला एक कुटुंब बनवण्याचे काम फेसबुकने केले आहे. आज इंस्टाग्रामवर अधिक वेळ घालवत असली तरी फेसबुक ही त्यांना तितकेच प्रिय आहे. फेसबुकवर सर्वच वयोगटातील लोकांचे अकाऊंट आहे. प्रत्येकाला फेसबुक जवळचा वाटतो. फेसबुक नंतर अनेक सोशल नेटवर्किंग साईट आल्या पण फेसबुकने आपला दर्जा कायम ठेवला त्यामुळेच २२ वर्ष होऊनही फेसबुकची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. सर्वांच्या लाडक्या फेसबुकला २२ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार, पुणे**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

४ फेब्रुवारी

१)श्रीम.शांता माधव अरविन्देकर चेंढरे-अलिबाग ०४-०२-१९३७

२)श्री.जवरू पांडुरंग म्हात्रे मु.कुरूळ, अलिबाग ०४-०२-१९४४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**डॉ. प्रतिभा सुभाष म्हात्रे, थळ, अलिबाग**

# अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

## • बदलापूर नगरपालिका प्रशासनाची धडक कारवाई

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

बदलापूरमध्ये मागील काही वर्षांत नियमनाविरुद्ध मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकामांचे प्रमाण वाढत चालले आहे. शहराला अनधिकृत बांधकामाचा विळखा बसत चालला आहे. त्यामुळे संपूर्ण शहर विद्रुप होत चालले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या संदर्भात नगरपरिषदेला चांगलेच फटकारले आणि कठोर कारवाई करण्याचा आदेश दिला होता, त्यामुळे बदलापूर नगरपरिषदेने आता धडक कारवाईची भूमीका घेतली आहे.

बदलापूर नगरपालिका प्रशासनानं अनधिकृत बांधकामांविरोधात धडक मोहीम हाती घेतली आहे. सोमवारी पालिकेमार्फत अंबरनाथ-बदलापूर हायवे तसेच पनवेल हायवे लगतची अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली. पुढील आठ ते दहा दिवस ही कारवाई सुरू राहणार आहे. यावेळी शहरातील ४००हून अधिक अनधिकृत बांधकामे हटवण्यात येतील, अशी माहिती पालिकेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी दिली आहे. या कारवाईमुळे अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



गेल्या काही वर्षात बदलापूर शहरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाली आहेत. यात व्यावसायिक दुकानांचे प्रमाण सर्वाधिक आहे. या बांधकामांबाबत अलीकडेच मुंबई उच्च न्यायालयाने पालिकेला आदेश दिले होते. त्यानुसार नगरपालिका प्रशासनांने ही धडक मोहीम हाती घेतली आहे. नगरपालिकेने शहरातील ४०० हून अधिक अनाधिकृत बांधकामांची यादी तयार केली आहे. पुढील आठ ते दहा दिवसात हे सर्व अनधिकृत बांधकामे हटवण्यात येणार आहेत. त्यामुळे बदलापूरची अनधिकृत बांधकामाच्या विळख्यातून सुटका होईल, असे बोलले जात आहे.

बदलापूरमधल्या या कारवाईचे नागरिकांनी स्वागत केले आहे. अनधिकृत बांधकामावर कडक कारवाई केली जाईल, असे पालिकेची मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी स्पष्ट केले आहे. आता अनधिकृत बांधकामावर कारवाई केली जाईल. मात्र काही काळानंतर त्याच ठिकाणी अनधिकृत बांधकामे पून्हा उभी राहातात. असे होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

कुळगाव-बदलापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली कुळगाव-बदलापूर नगर परिषदेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने बदलापूर पूर्व भागातील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे जेसीबीच्या सहाय्याने तोडली. त्यामध्ये अंबरनाथ-बदलापूर एमआयडीसी रोड तसेच प्रस्तावित पनवेल रोडवरील अनेक दुकाने, हॉटेल, स्नॅक्स कॉर्नर, दुचाकीचे शोरूम, फर्निचर दुकाने आदी पन्नासहून अधिक अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे जेसीबीच्या सहाय्याने भुईसपाट करण्यात आली. त्यामुळे अनेक रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला.

## बाबासाहेब ढाकणे यांचा सत्कार

**नवी मुंबई :** नवी मुंबई सानपाडा येथे राहणारे आणि भायखळा येथील मुंबई पोलीस विभागाच्या संरक्षण आणि सुरक्षा खात्यात पोलीस उप उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेले बाबासाहेब नाथा ढाकणे यांना प्रजासत्ताक दिनी त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल राष्ट्रपती पदक जाहीर झाले. याबद्दल त्यांचा ३१ जानेवारी रोजी सानपाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने आनंद मेळाव्यात शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या आनंद मेळाव्यात १०६ ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभासदांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक संघाला नेहमी सहकार्य करणारे सानपाडामधील माजी नगरसेवक सोमनाथ वासकर, उत्कर्ष व उन्नत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत रांजणे, उत्कर्ष पतपेढीचे सीईवो मानकुमरे त्याचप्रमाणे योगाचे महत्त्व सांगणाऱ्या न्यूज स्टोरी टुडेच्या निर्मात्या अलका भुजबळ व संपादक देवेंद्र भुजबळ या सर्व मान्यवरांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

## बल्लाळेश्वर देवस्थानतर्फे शस्त्रक्रिया शिबीर

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

डॉ भट नर्सिंग होम व बल्लाळेश्वर देवस्थान पाली यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत योजना शिबिरातर्गत आरोग्य शिबीर घेण्यात आले. हे शिबीर रविवारी (दि.१) बल्लाळेश्वर देवस्थान जुने कार्यालय या ठिकाणी पार पडले.

या शिबिरात ५७ नागरिकांनी लाभ घेतला. यामध्ये नाक, कान, घसा रुग्ण १२, अस्थीरुग्ण ३५, मुतखडा व कॅन्सर रुग्ण १० यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबाराचा लाभ घेतला. यात हाडाची शस्त्रक्रिया, कान-घसा शस्त्रक्रिया, मुतखडा शस्त्रक्रिया, कॅन्सर शस्त्रक्रिया, केमोथेरपी या आजारावर महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत योजनेत बसणाऱ्या २० नागरिकांची मोफत शस्त्रक्रिया रोहा येथे होणार आहे. श्री बल्लाळेश्वर देवस्थान पालीतर्फे अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. उदा. रक्तदान शिबीर, शैक्षणिक संस्थांना मदत, वृक्षलागवड, गंभीर आजार असलेल्या रुग्णांना आर्थिक मदत करण्यात येते, असे बल्लाळेश्वर देवस्थान अध्यक्ष जितेंद्र गद्रे यांनी सांगितले.

## सिकलसेल सॉल्युबिलिटी तपासणी शिबीर

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड जंजिरा प्राथमिक आरोग्य केंद्र व मुरुड वसंतराव नाईक महाविद्यालयातील एन. एस एस. युनिट १० व डिएलएलईच्या वतीने सिकलसेल सॉल्युबिलिटी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाच्या ५२ विद्यार्थीनींनी सॉल्युबिलिटी तपासणी केली.



यावेळी एनएसएस युनिट १०चे प्रमुख डॉ. श्रीशैल भैरगुंडे, तालुका सिकलसेल सहाय्यक शालीकराव पावरा, प्रयोगशाळा तंत्रज्ञ वैशाली पाटील, औषधनिर्मिता अधिकारी प्रसाद सुर्वे, आरोग्य सेविका रेश्मा साळवी, डॉ. नारायण बागुल, डॉ. सुभाष म्हात्रे, डॉ. सीमा नाहीद, प्राध्यापक गजानन मुनेश्वर, प्राध्यापक रुपी हसवारे, प्राध्यापक सिध्देश सतविडकर, प्रा. प्रणव बागवे, प्रा. मुस्कान रजब आदिंसह विद्यार्थी उपस्थित होते.

तालुका सिकलसेल सहाय्यक शालीकराव पावरा यांनी सिकलसेल सॉल्युबिलिटी आजाराविषयी सविस्तर माहिती आणि त्याची लक्षणे सांगितली. ते म्हणाले की, सिकलसेल हा लाल पेशीमध्ये होणारा आजार आहे. सिकलसेल रुग्णांमध्ये रक्तक्षय कमी असणे, अशक्तपणा, हातापायावर सुज येणे, कमरेची व सांधेदुखी काविळ पक्षघात पित्ताशय न भरून येणाऱ्या जखमा, मूत्रपिड निकामी होणे, डोळ्यावर परिणाम होणे, असह्य वेदना, जंतुसंसर्ग, शारीरिक त्रास मानसिक त्रास होतो.

## परसबाग स्पर्धेत मोठीजुई शाळा प्रथम

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

तालुकास्तरीय परसबाग स्पर्धेत उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा मोठीजुई शाळेने दैदीप्यमान यश मिळवले आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी लावलेल्या अथक परिश्रमाचे फळ म्हणून शाळेला २०२५-२६ या वर्षी स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मान मिळाला आहे. या अगोदर देखील शाळेला प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे.



निसर्गाचे महत्त्व आणि शेतीची आवड विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग दरवर्षी शाळांसाठी परसबाग स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेत तालुक्यातील अनेक नामांकित शाळांनी सहभाग घेतला होता. मात्र, मोठीजुई शाळेच्या परसबागेने भाजीपाला, फुलझाडे, मसाल्याचे पदार्थ,आणि औषधी वनस्पतींच्या लागवडीतील वैविध्य तसेच बागेची उत्तम निगा राखण्याच्या निकषांवर परीक्षकांची मने जिंकली.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी या यशाचे श्रेय विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नांना दिले आहे. 'या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ शेतीचे प्रात्यक्षिक ज्ञान मिळाले नाही, तर त्यांच्यात जबाबदारीची आणि निसर्गाबद्दलची आस्था देखील वाढली,' असे मत मुख्याध्यापकांनी व्यक्त केले.

## मद्यधुंद पर्यटकांवर कारवाई व्हावी

### म्हसळ्यातील नागरिकांचे प्रशासनाला निवेदन

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन, बोर्ली आणि दिवेआगर यांसारख्या पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या मार्गावर पर्यटकांच्या बेदरकार वाहनचालनामुळे अपघातांचे सत्र सुरूच आहे. दोन दिवसांपूर्वी झालेल्या एका भीषण अपघाताच्या पार्श्वभूमीवर, म्हसळा शहरातील सजग नागरिकांनी आक्रमक पवित्रा घेतला असून रायगडच्या पोलीस अधीक्षकांना निवेदन सादर केले आहे. बोर्ली आणि दिवेआगर ही ठिकाणे जागतिक स्तरावर पर्यटनासाठी प्रसिद्ध असल्याने सुट्टीच्या काळात येथे पर्यटकांची मोठी गर्दी असते. मात्र, याच गर्दीचा फायदा घेत अनेक पर्यटक वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवत आहेत. नागरिकांनी निवेदनातील प्रमुख मुद्द्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. अतिवेग आणि बेदरकार ड्रायव्हिंग, मद्यपान करून वाहन चालवणे, पर्यटकांकडून होणारी मद्यप्राशन करून ड्रायव्हिंगची वाढती प्रकरणे,रस्त्यांवरील अपुरी सुरक्षा यंत्रणा अपघातांना निमंत्रण देत आहे. यामुळे स्थानिक नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून, परिसरात भीतीचे वातावरण आहे.

भविष्यातील जीवितहानी टाळण्यासाठी म्हसळावासीयांनी प्रशासनाकडे ठोस उपाययोजनेची मागणी केली आहे. त्यानुसार मुख्य मार्गांवर आणि अपघातप्रवण क्षेत्रांत वाढीव पोलीस तैनात करणे. मद्यपी चालकांसाठी ड्रिंक अँड ड्राइव्हची धडक मोहीम राबवणे. वेगमर्यादा दर्शविणारे फलक आणि आवश्यक ठिकाणी गतिरोधक बसवणे. पोलीस पेट्रोलिंग वाढवणे इत्यादी.

हे निवेदन म्हसळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांच्याकडे सोपवण्यात आले. यावेळी मुसद्दिक इनामदार, संजय खांबेटे, दिपल शिर्के, नंदू शिर्के, सलीम बागकर, शाहिद जंजीरकर, रियाज घराडे, दिलीप करमरकर, सरफराज दर्जी, निहाल पेणकर, शगुप्ता जहांगीर यांसह शहरातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पदवीधर विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सायन्स असोसिएशनमार्फत विज्ञान शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांसाठी 'करिअरच्या संधी' या विषयावर विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तळोजा येथील श्रीकेम लॅबचे उपाध्यक्ष डॉ. व्यंकटेश कटगिरी हे कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी नवी मुंबईतील तळोजा, तुर्भे आणि पातळगंगा यांसारख्या मोठ्या औद्योगिक पट्ट्यांमध्ये विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या रोजगाराच्या संधी याबाबत सविस्तर माहिती दिली.




यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. कटगिरी यांनी सांगितले की, प्रशिक्षित असणे काळाची गरज आहे. उद्योग जगतात संधींचे सोने करायचे असेल, तर तरुण पिढी केवळ पदवीधर असून चालणार नाही. तर ती तांत्रिकदृष्ट्या प्रशिक्षित असणे आवश्यक आहे. त्यांनी औषध निर्माण कंपन्यांमधील संशोधन आणि विकास, उत्पादन विभाग आणि गुणवत्ता नियंत्रण या विभागांतील कामकाजाची आणि तेथील नोकरीच्या संधींची माहिती दिली.

महाविद्यालयाचे प्रभारी प्रा. डॉ. आमोद ठक्कर विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मनातील न्यूनगंड काढून टाकावा आणि स्वतःच्या कौशल्यांवर काम करावे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी पुरेशी नसून, कौशल्य आत्मसात केल्यास नोकरी मिळविणे सोपे होते, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

उपप्राचार्य तथा कार्यशाळेचे समन्वयक डॉ. अनिल पालवे यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. याप्रसंगी डॉ. गुरुमीत वाधवा, चेतना तुंबडे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अनेक शिवभक्तांची उपस्थिती | पोवाड्यांसह विद्यार्थ्यांकडून नृत्य सादर

# चावणी उंबरखिंडीत विजय दिन साजरा

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

सह्याद्रीच्या कुशीत चावणी (छावणी) येथील उंबरखिंडीत ३६५वा विजय दिन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी सकाळी विजय स्तंभाचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून श्रीफळ फोडून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी मूठभर मावळ्यांना घेऊन १६६१ रोजी कारतलब खानाच्या तीस हजार मुघल सैन्यावर प्रचंड मोठा हल्ला करत मुघल सैन्यांचा दारुण पराभर करत या उंबरखिंडीत मोठा विजय मिळवला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या कर्तृत्वाला आणि त्यांच्या आठवणींना उजाळा मिळावा, यासाठी उंबरखिंड येथे दरवर्षी मोठ्या उत्साहात विजय दिन सोहळा साजरा करण्यात येतो.



दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ग्रामपंचायत चावणी, ग्रामस्थ चावणी, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती खालापूर आणि शिवदुर्ग मित्र मंडळ लोणावळा यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

यावेळी शिवशाहीर रायगड भूषण वैभव घरत यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वावार पोवाडे सादर केले. तर शिवाव्याख्याते ॲड. विनय दाभाडे यांचे छत्रपती शिवाजी महाराजांविषयी महत्वाचे व्याख्यान झाले. तर शाळेच्या विद्यार्थ्यांनी भाषणे, नृत्याचे सादरीकरण केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य नरेश पाटील, खोपोलीचे माजी नगरध्यक्ष डॉ. सुनील पाटील, खालापूरचे पोलीस निरीक्षक सचिन पवार, वावोशी पोलीस स्टेशनचे संतोष आवटी, शिवदुर्ग मित्र मंडळ अध्यक्ष सुनील गायकवाड, चावणी ग्रामपंचायतचे सरपंच बाळासाहेब आखाडे, उपसरपंच सुखदेव भोसले, सदस्य रमेश चव्हाण, सदस्या संगीता चिंचावडे, प्राची पाटील, सखू वाघमारे, ग्रामस्थ गणेश चव्हाण, पोलीस पाटील समीर पाटील, बाळू बुधलेकर, गणपत चव्हाण, पांडुरंग पाटील, चेतन पाटील, हिरामण पाटील, हरेश पाटील, ऋतिक नांदुस्कर, किशोर डफाळ, मयूर डफळ धनराज डफाळ, प्रदीप भवुड, राजू डफाळ, आकाश पाताडे, नरेश पाटील, बापू पाटील, सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र पुकळे, आनंदराव कचरे, जयंत भवुड हेल्प फाउंडेशनचे अध्यक्ष गुरुनाथ साठीकर, रुपेश शेडगेंसह अनेक शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक



### आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

**तळा :** द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा येथे सोमवारी (दि.२) प्रभाकर जोशी आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळाचा विद्यार्थी दीक्षांत घाग प्रथम वर्ष बी.एस.सी. याने आपला सहभाग नोंदवून भारतीय संविधान-आयडिया ऑफ इंडिया या विषयावर आपले मनोगत अत्यंत परखडपणे व्यक्त केले. त्याला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अमोल निकम आणि सांस्कृतिक विभागाचे इतर सदस्य तसेच महाविद्यालयातील इतर विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक दोन हजार रोख, सन्मानचिन्ह अणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे संस्थापक मा. डॉ. नंदकुमारजी वेदक, संस्थेचे सचिव उन्मेशजी वेदक तसेच महाविद्यालय विकास समितीचे ज्येष्ठ सदस्य मा. पुरुषोत्तम मुळे आणि डॉ. नानासाहेब यादव यांनी दीक्षांतचे अभिनंदन केले.

### माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन



**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील सरखेल कान्होजी आंग्रे हायस्कूल चिखली तालुकामधील एसएससी बॅच सन १९७१-७२च्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन रविवारी (दि.१) आंबेघर पळी येथे उत्साही वातावरणात पार पडले. यासाठी पुणे, मुंबई, नवी मुंबई पनवेल, पेण अलिबाग, कुर्डुस, कुसुम्बळे आदी ठिकाणाहून माजी विद्यार्थी आले होते. आपल्या शाळेतील आठवणींना उजाळा देण्यासाठी ५४ वर्षांनी मित्र मैत्रिणी एकत्र भेटल्याने एक वेगळाच आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. जोश आणि हौस सर्वांमध्ये दिसत होती. विशेष म्हणजे नामांकित मुंबई हायकोर्ट जज कोळसे पाटील यांच्या सुविध पत्नी विजया खराडे, सुमन खराडे, अशोक खराडे यांनी या कार्यक्रमात हजेरी लावली. यासाठी जगदीश खरसंबळे, विलास कोठेकर, सचिदानंद पाटील, प्रमिला पाटील यांनी खूप मेहनत घेतली. यावेळी उपस्थित माजी विध्यार्थी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदाशिव कोठेकर यांनी सूत्र संचालन केले. शेवटी जगदीश खरसंबळे यांनी आभार मानले.

### श्वेता धारशे काळाच्या पडद्याआड



**महाड :** महाड तालुक्यातील भेलोशी गावचे रहिवासी तसेच कलगी तुरा समाज उन्नती मंडळाचे सरचिटणीस संतोष धारशे यांच्या पत्नी श्वेता संतोष धारशे यांचे वयाच्या ४५ वर्षी निधन झाले. भेलोशी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय, कला क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनाने संपूर्ण पंचक्रोशीवर शोककला पसरली आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले साईराज आणि साईल, सासू-सासरे असा परिवार आहे. त्याचे अंतिम विधी शुक्रवार दि.६ फेब्रुवारी, दशक्रिया विधी सोमवार दि.९ फेब्रुवारी, तर उत्तरकार्य बुधवार दि.११ फेब्रुवारी रोजी भेलोशी येथील त्यांच्या निवासस्थानी होणार आहेत.



### समाज गौरव पुरस्कार वितरण

**तळा :** श्रमजीवी परिवार, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे २०वे राज्यस्तरीय स्नेहसंमेलन आणि श्रमजीवी समाजभूषण पुरस्कार वितरण आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा रविवारी (दि.१) दापोली येथील रसिक रंजन नाट्यमंदिर येथे उत्साही व आनंदी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाहीर रत्नाकर महाकाळ यांचा मराठी वाद्य वृंदाचा कार्यक्रम बहारदारपणे यशस्वीरित्या पार पडला. मल्हारी मार्तंड छत्रपती शिवाजी राजे, धर्म रक्षक संभाजी राजे यांच्या गायनातून सादर केलेले प्रसंग, लावणी नृत्य, लोकनृत्य, पोवाडा यासह विविध गीतांची मैफिल सादर करीत रसिक जनतेची मने जिंकली. तर आपल्या बहारदार गीतामधून श्रमजीवी परिवाराचा आलेख, प्रमुख पाहुणे धनराज वंजारी यांच्या कार्याचा गौरव स्वरचित गीतातून शाहीर रत्नाकर महाकाळ यांनी उत्तम प्रकारे सादर केला. यानंतर मुख्य कार्यक्रम श्रमजीवीचा समाज गौरव पुरस्कार वितरणाला सुरुवात झाली. जवळपास राज्यभरातील शिक्षण समाजसेवा, व्यापार, राष्ट्रभक्ती, राजकीय, क्रीडा, कला क्षेत्र अशा विविध क्षेत्रातील ५२ गुणवंत व्यक्तींचा सन्मान शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पुष्पगुच्छ, मानाचा फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

### जितेंद्र म्हात्रे यांना मातृशोक



**उरण :** न्हावा गावचे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे यांच्या मातोश्री बबिबाई दामोदर म्हात्रे यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी रविवारी (दि.१) निधन झाले. त्यांच्या निधनाने म्हात्रे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. न्हावा गावाच्या स्मशानभूमीत अनेक मान्यवर, नातेवाईक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. त्यांच्या पश्चात मुले, मुली, जावई, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवार, दि.१० फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता न्हावा जेटी (खाडी) येथे होणार आहेत. तर दिवसकार्य गुरुवार, दि.१२ फेब्रुवारी रोजी न्हावा येथील राहत्या घरी करण्यात येणार आहे, अशी माहिती म्हात्रे कुटुंबीयांनी दिली आहे.

# उल्हासनदीच्या पाण्यात जलपर्णीचा तवंग

■ पोहण्याची मजा घेणाऱ्याच्या शरीराला खाज
■ पाणी परीक्षणासाठी मुंबईत पाठवणार

| नेरळ | प्रतिनिधी |

टाटा कंपनीच्या आंध्रा धरणाचे पाणी कर्जत तालुक्यातून वाहताना उल्हास नदीमधून ठाणे जिल्ह्यात जाते. धरणाचे पाणी पेज नदीमधून आणि नंतर उल्हास नदीमधून वाहत जाते. त्यामुळे कर्जत शहराच्यामधून वाहणारी उल्हास नदीमध्ये सांडपाणी वाहत जाते आणि त्यामुळे हि नदी प्रदूषित होते. त्यांचा फटका जानेवारी महिन्यापासून बसण्यास सुरुवात होते आणि आता उल्हास नदीचे पाणी हिरवेगार बनले आहे. दरम्यान, पाण्यावर बसणारा हिरवा तवंग दिसून येऊ लागला आहे. त्यांचा परिणाम त्या पाण्याला खाज येत असून त्या दूषित पाण्यामुळे आजार होण्याची शक्यता बळावली आहे.



## नदी प्रदूषित झाल्याने भीती

मात्र सध्या पाण्यात डिसरणारे हिरवे तवांगामुळे पाण्यात उतरण्याची हिम्मत सर्वसामान्य लोक करीत नाही. त्यांचे कारण म्हणजे त्या हिरव्या पाण्याला चिकटपणा असून त्याचा परिणाम अंगावर खाज येण्यास होत असतो. हिरवेगार तवंग बघून उल्हास नदी प्रदूषित झाली असल्याचा निष्कर्ष निघत आहे. त्याचवेळी पर्यावरणप्रेमी आणि उल्हस नदी जल संवर्धन समितीकडून देखील या तवंग याबाबत विचारविनिमय सुरु झाला आहे.

कर्जत येथून खऱ्या अर्थाने उल्हासनदीला सध्या जलपर्णीचा विळखा बसला आहे.तेथे मोठ्या प्रमाणात जलपर्णी उल्हास नदीत जमा झालीआहे. मागील अनेकदा या जलपर्णी काढण्याचे काम कर्जत परिसरात हाती घेण्यात आले आहे. परन्तु काढलेली जलपर्णी ही नदी पात्रातून काढून बाहेर न टाकता नदीपात्रातच टाकली जात असल्याने ही जलपर्णी नेरळ, शेलू, वांगणी परिसरात पाण्याच्या प्रवाहात वाहून जाऊन नदी पत्रातील पाणी दूषित झाले आहे.ते सर्व हिरवेगार जलपर्णी यांचे जंगल हे सांडपाण्यामुळे तयार झाले आहे. कर्जत शहरातून काही प्रमाणात सांडपाणी हे पुढे नदीतून खाली वाहून जात असते. त्या पाण्यात दररोज जलपर्णी वाहून पुढे आंबिवली येथून बारमाही वाहत्या बनलेल्या उल्हासनदीतुन तरंगत जाताना दिसत आहे.

या जलपर्णी मे महिन्यातून उल्हासनदीच्या पाण्यातून वाहत जाताना अनेकदा दिसात होते. मात्र, मागील दोन वर्षांपासून उल्हासनदीमध्ये जलपर्णी या जानेवारी महिन्यापासून पाण्यात वाहत जाताना दिसत आहेत. त्यामुळे उल्हास नदीचे पाणी पिण्यासाठी वापरणाऱ्या अर्धा कर्जत तालुका आणि पुढे ठाणे जिल्ह्यातील कल्याणपर्यंतचा भाग या पाण्यावर अवलंबून आहे. सर्व लोक पिण्याचे पाणी वापरतात. हे दूषित हिरवेगार पाणी पाहून सर्व घाबरले आहेत. कारण नदीचे पाणी केवळ गढूळ बनले नाही तर त्या पाण्याला चिकटपणा देखील आला असून दुसरीकडे वाहत्या नदीमध्ये पोहण्याची मजा घेणारे यांच्या शरीरावर खाज सुटण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नदीमध्ये पोहायला जाणारे यांची संख्या कमी झाली असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. ही समस्या केवळ कर्जत शहरातील सांडपाणी उल्हासनदीमध्ये सोडल्यामुळे निर्माण झालेली नाही. तर गेल्या काही वर्षात सातत्याने नागरीकरण झालेल्या नेरळ शहर वजा गावातून असलेल्या रहिवाशी भागातील सांडपाणी देखील माथेरानच्या डोंगरातून पावसाळ्यात पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यात सोडले आहे. तो नाला पुढे उल्हासनदीला जाऊन मिळतो.

त्यामुळे कर्जत नंतर उल्हासनदीमध्ये नदीचे पाणी प्रदूषित करणारे जलपर्णी यांचे उगम हे नेरळ गावातून देखील झाले आहे. सांडपाणी येथे उल्हासनदीमध्ये गेल्यानंतर जलपर्णी यांच्या संख्येने वाढ होते. हि समस्या केवळ सांडपाण्यामुळे निर्माण झाली असल्याचे सगुणाबाग कृषी पर्यटन केंद्राच्या नदीचे पाणी मुंबई येथे परीक्षणासाठी पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

# निवडक



## रातवड विद्यालयास क्रीडा साहित्य

**माणगाव :** मेवाड नवयुवक मंडळ, मुंबई यांच्या वतीने छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर, रा-तवड या विद्यालयास २१ नवीन बेंचेस तसेच क्रीडा साहित्याची भेट देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व शारीरिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. सदर बेंचेस व क्रीडा साहित्य कृष्णाजी महाडिक यांच्या प्रयत्नातून विद्यालयास प्राप्त झाले. समाजोपयोगी उपक्रमांमधून शैक्षणिक संस्थांना मदत करण्याचा मंडळाचा हा उपक्रम स्तुत्य असून, भविष्यातही असे उपक्रम राबविले जातील, अशी ग्वाही मंडळाच्या वतीने देण्यात आली. विद्यालयास नवीन बेंचेस व क्रीडा साहित्य प्राप्त झाल्याबद्दल विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षणप्रेमी यांनी आनंद व्यक्त केला आहे.या कार्यक्रमास मेवाड नवरत्न मंडळाचे अध्यक्ष विजेश पामेचा, सुमित धाकड, गौतम बोहरा, कपिल पामेचा, लोकेश कोठारी, डॉ. नंदकुमार जोशी, डॉ. निलेश रेवगडे व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्याक संतोष कदम, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## महाविद्यालयात मतदान जनजागृती

माणगाव : माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मतदान जनजागृती कार्यक्रम २५ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत राबविण्यात आला. मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो या प्रेरक संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी मतदान जनजागृतीची शपथ घेतली. लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचे महत्त्व अधोरेखित करत, स्वयंसेवकांनी महाविद्यालयीन परिसरासह समाजात जाऊन प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावावा, असे प्रभावी आवाहन केले. मतदान ही केवळ प्रक्रिया नसून नागरिकांची जबाबदारी व लोकशाहीची खरी ताकद आहे, हा संदेश उपक्रमातून पोहोचविण्यात आला. महाविद्यालयात विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रांगोळी स्पर्धा, मतदान जनजागृतीवरील निबंध स्पर्धा, माझे मत अमूल्य मत या विषयावरील घोषवाक्य स्पर्धा, मतदान हा आपला हक्क या विषयावरील पोस्टर स्पर्धा, तसेच वक्तृत्व स्पर्धा यांचा समावेश होता. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रभावीपणे मांडत मतदानाचे सामाजिक व लोकशाहीतील महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा. डॉ. बी. एम. खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. नेहा गावडे व प्रा. स्वप्निल सकपाळ यांनी मार्गदर्शन केले.

## शाळेच्या छतावर फुलवला मळा




**नेरळ :** हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांचे जन्मगाव असलेल्या गावातील शाळेच्या छतावर भाजीपाल्याची बाग फुलली आहे. विद्यार्थ्यांनी श्रमदान करून भाजीपाला लावण्यासाठी कुंड्या आणल्या आणि मातीपासून भाजीपाल्याची रोपे तयार केली. साधारण जुलै महिन्यात हाती घेतलेला हा उपक्रम यशस्वी झाला असून माझी शाळा, माझी परसबाग अंतर्गत यशस्वी ठरलेला हा उपक्रम कुतूहलाचे विषय बनले आहे. शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग असलेल्या या उपक्रमाचा पुढील अध्याय म्हणून माझी शाळा माझी परसबाग हा उपक्रम परशुराम राठोड, सुनंदा पाटील, संज्योती कांबरी, अनिता कडलग, रोहिणी राहिंज यांनी सर्व विद्यार्थ्यांना परसबाग फुलवण्याची आणि त्या बागेत विविध प्रकारचा भाजीपाला तयार करण्याची संकल्पना पुढे आली. शाळेत जागे अभावी परसबाग तयार करता येत नव्हती. यावेळी ग्रो बॅगचा वापर करून परसबाग करण्याच्या कामी पक्षीप्रेमी आणि पक्षीनिरीक्षक मृणाल घोसाळकर यांनी या उपक्रमासाठी उपलब्ध करून दिल्या. त्यानंतर सर्व बॅग या शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांकडून माती घेऊन त्या बॅगेत भरून रोपे तयार झाली. शाळेच्या टेरेसवर लोखंडी पाईप उभे करून त्यावर पत्र्याचे छप्पर बनविले आहे. बागेत कोबी, वांगी, पालक, कोथिंबीर, मुळा, मेथी या भाज्या तसेच वेगवगेळी प्रकारची फुले फुलली आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- We are inviting for internship to graduate candidates for share market trading.Stipend will be paid. For interview call 9923750549
- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार- १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१
- कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- गावरान कोंबडीची (सोनाली) पिल्ले मिळतील. मु.पो.आक्षी, अलिबाग, संपर्क : ९२७०५९०६२३
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# डॉ. महेश यांना ज्योतिष्य रत्नशास्त्र पदवी प्रदान

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

खोपोलीत गेली अनेक वर्ष वास्तव्ये करून सुखी वास्तू स्पिरिच्युअल सर्व्हिसेस या माध्यमातून उत्तम कार्य करीत असून, आजवर अनेक कुटुंब सुखी समाधानी केले. आपल्याजवळ असलेल्या ज्ञानाचा वापर करून समाज कल्याणासाठी व्हावे, या उदात्त विचारातून गेले अनेक वर्षात विविध संस्थेच्या माध्यमातून त्यांस सन्मानित करण्यात आले आहे. नुकताच नामांकित संस्थेच्या माध्यमातून ज्योतिष्य रत्नशास्त्र विषयावर पदवी बहाल करण्यात आली. नाशिक येथिल मुक्तीधाम



येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ज्योतिष्य रत्नशास्त्र विषयाचे अभ्यासक्रम पूर्ण झालेल्या प्रतीक जोशी यांच्या दीनानाथ ज्योतिष्यालय या नाशिकच्या नामांकित संस्थेतून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण पदवी बहाल करून त्यांचा त्यास सन्मानित करण्यात आला.

# अलिबागमध्ये भाषा संवर्धनाचा जागर

| अलिबाग | प्रतिनिधी |

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, रायगड तसेच सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय, डोंगरे हॉल, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन व मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी समाजाने एकत्रितपणे पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी मराठी भाषेच्या सद्यस्थितीवर भाष्य केले. महाराष्ट्रात व्यवसायानिमित्त येणाऱ्या परप्रांतीयांची मुले मराठी शाळेत शिक्षण




घेतात, मात्र आपल्या राज्यातीलच अनेक कुटुंबे स्वतःची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळांत पाठवतात, ही शोकांतिका आहे, असल्याचे सांगितले. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर तिचा गौरव वाढवणे आणि तिचा वापर वाढवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच अलिबागच्या सांस्कृतिक वैभवाच्या जतनामध्ये ग्रंथालयांची महत्त्वाची भूमिका राहिल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष नागेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी व्यापक वाचन अभियान व ग्रंथालय अभियान राबवण्याची गरज व्यक्त केली. तसेच बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगातही पुस्तकांशी नाळ जुळलेली राहावी, यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

सुनील पाटील यांनी मराठी शाळांचे महत्त्व विशद करताना जुन्या शालेय आठवणींना उजाळा दिला. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने व्यक्तिमत्व विकास अधिक प्रभावीपणे घडतो, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास ममता रोगे, संतोष पेरेकर, अभय हातणकर, हेमंत राऊत, रजिता मालवी, अमित धुमाळ, अपूर्व वर्तक, अंकित म्हात्रे, अभिषेक भगत यांच्यासह साहित्यप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठी भाषेचा अभिमान बाळगण्यासोबतच तिच्या संवर्धनासाठी प्रत्यक्ष कृती करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

# महिला सन्मान योजना तिकीटा पुरती

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची महिला सन्मान योजना शासनाने महिला प्रवाशांना एसटी बसच्या सर्व प्रकारच्या तिकिटांवर पन्नास टक्के सवलत देणारी योजना आहे. या योजनेचा लाभ महिला वर्गाला मिळतोय. परंतु, ही योजना फक्त तिकीटा पुरती मर्यादित असल्याचे दिसून येते. शनिवारी ३१ जानेवारी रोजी श्रीवर्धन आगाराच्या डोंगरी मुंबई-श्रीवर्धन या बसमध्ये श्रीवर्धन येथील तन्वी बाक्कर यांनी माणगाव स्थानकात श्रीवर्धन गावात येण्यासाठी वाहकाकडून तिकीट घेतले. परंतु, बस श्रीवर्धन स्थानक येथे येताच चालकाने बस गावात



जाणार नाही असे सांगत प्रवाशांना खाली उतरवले. तिकीट गावातील काढले आहे असा प्रवासी वर्गाने खुलासा करून ही चालकाने बस गावात नेण्यास नकार दिला. यावेळी वाहकाने ही गावातील फेरी बाबतीत चालकाला कुठलीच सुचना न दिल्याने प्रवासी वर्गाने नाराजी व्यक्त केली आहे. सुट्टीच्या दिवसात श्रीवर्धन बाजारपेठेत व इतर मार्गावर पर्यटकांची वाहने उभी असल्याने बस गावातून नेण्यास त्रासदायक होते व बस मुळे काही वेळा वाहतूक कोंडी होऊ शकते.या कारणास्तव सुट्टीच्या दिवसात बसची गावातील फेरी बंद करण्यात येते असा खुलासा श्रीवर्धन बसस्थानक व्यवस्थापनाने केला आहे.

## रोजगाराची सुवर्णसंधी

**पनवेल :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या आदेशानुसार ८ फेब्रुवारी रोजी श्री बापूसाहेब डी. डी. विसपुते बीएड कॉलेज ऑफ एज्युकेशन पनवेल येथे युवा शक्ती फाऊंडेशन आणि श्री डी.डी. विसपुते कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. मेळाव्यात महाराष्ट्रातील २० पेक्षा अधिक नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. केवळ मुक्त विद्यापीठाचेच नाही तर इतर विद्यापीठातील विद्यार्थी देखील या रोजगार मेळाव्यास नोंदणी करू शकतात.

# दुबईत गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणूक

| पनवेल | प्रतिनिधी |

नवीन पनवेल दुबई येथे वेगवेगळ्या व्यवसायामध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडून एका भामट्याने पनवेल परिसरातील तक्का परिसरात राहणाऱ्या महिलेची तब्बल ४३ लाख ४१ हजार ३५० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी हमझा रमकडाचाला याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसनीम असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव आहे, त्यांनी जून २०२३ ते फेब्रुवारी २०२४ हमला याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून दुबई येथे व्यवसायामध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. तसनीम गांनी बँक खात्यातून हमझा वाने व्हॉट्सअॅपवर विविध खात्यात ४३ लाख ४१ हजार ३५० रुपये पाठवून दिले. ही रक्कम पाठवल्यानंतर हमला याने त्यांना नफा देणे तर दूरच राहिले तसनीम यांनी गुंतवणूक केलेली रक्कमही दिली नाही. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तसनीम यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली आहे.

# घरबसल्या पैसे कमवण्याचे आमिषाने लाखोंचा गंडा

| पनवेल | प्रतिनिधी |

जादा नफ्याचे आणि घरबसल्या लाखो रुपये कमवण्याचे आमिष दाखवून क्यू-नेट सारख्या स्कीमद्वारे एका सुशिक्षित महिलेची ३ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक झाली आहे. विशेष म्हणजे या विवाहितेच्या कॉलेज मित्रानेच ही फसवणूक केली आहे. अभिषेक झगडे (३१) असे त्याचे नाव असून खांदेश्वर पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ३० वर्षीय तक्रारदार विवाहिता खांदा कॉलनी येथे राहणारी असून ती तळोजा एमआयडीसीतील एका कंपनीत काम करते. जून २०२४ मध्ये या विवाहितेचा कॉलेज मित्र अभिषेकने तिची भेट घेतली होती. त्यावेळी त्याने क्यू-नेट ग्लोबल कंपनीत पार्टनरशिपमध्ये काम करत असल्याचे व त्याला गेल्या महिन्यात ७० हजार रुपये नफा मिळणार असे सांगितले. तसेच मुलाला सांभाळून घरबसल्या १० ते २० हजार रुपये कमवता येऊ शकतात, असे सांगून विश्वास संपादन केला. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून नोव्हेंबर २०२४ मध्ये म्युच्युअल फंडातील ३ लाख ७० हजार रुपये काढून ते दिले. पैसे परत न मिळाल्यास फसवणूक झाल्याचे समजले.

# खोपटा पुलावर अवजड वाहनांचा असह्य भार

| उरण | प्रतिनिधी |

खोपटा रस्त्याच्या सुरू असलेल्या काँक्रिटीकरणाच्या कामामुळे रात्री-अपरात्री भीषण वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. एकंदरीत प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे त्याचा त्रास सर्वसामान्य प्रवासी, विद्यार्थी, रुग्णांना सहन करावा लागत आहे.

खोपटा पूल ते कोप्रोली या रस्त्यावरून जेएनपीए, द्रोणागिरीकडे जाणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र प्रशासनाच्या नियोजनशून्य नव्याने सुरू असलेल्या काँक्रीटीकरण



## वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मागणी

कामामुळे रात्री-अपरात्री या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वर्दळ ही सुरू असते. तरी प्रशासनाने वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी कोप्रोली गाव कमिटीचे अध्यक्ष मनोहर म्हात्रे यांनी केली आहे. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम खात्याचे उपअभियंता नरेश पवार यांच्याशी संपर्क साधला असता प्रतिसाद देण्यात आले नाही.

> "आमचे कर्मचारी सातत्याने त्या मार्गावर वाहतूक कोंडी करण्यासाठी सक्रिय आहेत. मात्र, एकच पूल चालू असल्याने आणि एकच रस्त्यातून वाहन चालत असल्याने वाहने ही स्लो असतात. त्यातच एक वाहन बंद पडले होते. त्यामुळे ही वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.
> -अतुल दहिफळे
> उरण वाहतूक वरिष्ठ पोलीस निरीक्षक"

लांबलेल्या पावसाने ऋतू चक्र बदलले | निसर्गाचे आगळेवेगळे रूप निसर्गप्रेमींना सुखावते

# फुलांच्या बहरांने वसंताची चाहूल

| माणगाव | प्रतिनिधी |

वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर हे भारतीय ऋतू निसर्गातीलविविध बदलांची नांदी देतात. बारा महिन्यातील विभागून ऋतूचक्र सांगणारे हे ऋतू निसर्गाची विविध रूपे समोर आणतात. हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे मार्गशिर्ष आणि पौष या महिन्यात शिशिर ऋतू असतो. डिसेंबर महिन्याचा उत्तरार्ध, जानेवारी महिना व फेब्रुवारी महिन्याच्या पूर्वार्धात शिशिर ऋतू असतो. या ऋतूचे वैशिष्टय म्हणजे 'झाडांची पानगळ' झाडांची पानगळ सुरू झाली कि शिशिर ऋतू सुरू झाला असा जनमानसात समज आहे.

यावर्षी मात्र नोव्हेंबर महिन्याच्या ८ तारखेपर्यंत



लांबलेल्या पावसाने निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलवून टाकले होते. मात्र ठराविक काळानंतर येणारे ऋतूचक्र सतत सुरू असून शिशिर ऋतूने पानगळीला सुरूवात केली आहे.

मोठया पानांच्या झाडांची पाने या ऋतूत गळतात. झाडे पूर्णपणे निष्पर्ण होतात. काहीसं भकास उदास असे माळरानाचे चित्र या ऋतूत दिसून येते. निसर्गाला नवे रूप देणारा हा ऋतू शेती आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीनेही महत्वाचा मानला जातो.

## निसर्गाचे आगळेवेगळे

सध्या मात्र रानावनात मोठ्या प्रमाणात पळस, करवंद आदी फुलांना मोठ्या प्रमाणात बहर येत आहे. हे दृश्य अतिशय सुंदर दिसत असून निसर्गाच्या या रूपाचे आगळेवेगळे रूप निसर्गप्रेमींना सुखावत आहे.

जानेवारी फेब्रुवारी महीन्यात असणारा हा ऋतू थंडीचा ऋतू म्हणूनही ओळखला जातो. शिशिराची पानगळ झाली असून झाडांची पाने पिवळीगर्द होवून गळण्यास सुरूवात झाली आहे. काहीसा उदास वाटणारा हा ऋतू गारावा थंडी आणि पानगळ घेऊन येतो. या ऋतूतील सणही ऋतूमानाचा विचार करून आहार विहार देतात. मकरसंक्रात हा त्यातीलच महत्वाचा सण. उत्तम आरोग्यासाठी स्निग्ध पदार्थ खाण्याचा, थंडीचे कपडे, हलका व्यायाम आणि आरोग्यदायी आहार सांभाळून या ऋतूत आरोग्याची काळजी घेतली जाते.

झाडांची झालेली पानगळ शेतकऱ्यांनाराब देवून जाते. झाडांचा गळलेला हाच पालापाचोळा शेतकरी शेतीसाठी वापरतात. निसर्गाला नवे अंकूर देणारा जूनं जाऊ द्या मरणा लागूनी म्हणणारा हा ऋतू वसंताची चाहूल देतो. निष्पर्ण झालेल्या फांदीतून रंगीबेरंगी फुलांचे गुच्छ याच ऋतूच्या अखेरीस पहावयास मिळतात. एका अर्थाने नवसर्जनास पार्श्वभूमी निर्माण करणारा विरक्तीचा संदेश देणारा हा ऋतू वसंताची चाहूल देतो.

या ऋतूतच रानोमाळ आंब्याच्या, काजूच्या मोहोराचा घमघमाट येत राहतो. करवंदीच्या जाळीमधून पांढरीशूभ्र फुले डोकावतात आणि पांगिरा, फळस, चाफा आदी. असंख्य झाडे पुष्पगुच्छांची बरसात करतात. या ऋतूच्या उत्तरार्धात सुरू होतो तो सृष्टीचे नवचैतन्य बहरणारा वसंत ऋतू आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे नाडसूर, ता. सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.किशोर रामचंद्र मेणे. | ३०५ | ०-८०-०० | ४-०७ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ०४/०२/२०२६

**खरेदीदारांतर्फे,**
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६अ राठोड सदन ऑफिस नं.७ पाली, ता.सुधागड,
जि.रायगड. मो.९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या बिनशेतजमिन मिळकतीचे मालक श्री.हरेश अनंत म्हसे यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील बिनशेतजमिन मिळकत आमचे अशिल यांना कायमस्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांचे बरोबर केलेली आहेत. मौजे-नालधे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड ४१०२०१ येथील सामाईक बिनशेतजमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे नमुद केले आहे:-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | अकृषिक क्षेत्र (आर.चौ.मी.चौ.से.मी) | आकारणी |
|---|---|---|
| ७९/१५४ | २.७३.०० | २७.३० |

तरी बिनशेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, वहिवाट बयाणा पावती, साठेकरार गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे केसेस व मनाईहुकूम, न्यायनिर्णय, आदेश, तसेच त्रयस्थ इसमांबरोबर केलेला करारनामा व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख ०४/०२/२०२६

सही /-
**ॲड.जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉल
शेजारी, धामोते, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
४१०१०१, मो. नं. ८३६९२१७३१३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि.रायगड खालील नमुद वर्णनाची बागायत जमिन मिळकत श्री. अनंत उर्फ आनंत मधुकर रुमडे, रा. मु. चौल, चंपावती गल्ली, पो. चौल, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या खुद्द मालकीची असून सदरील बागायत जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चौल, ता.अलिबाग | २६७८/२/ब | बागायत क्षेत्र ०-३०-००<br>पो.ख. ०-०१-५९<br>एकूण क्षेत्र ०-३१-५९ | १५.१० |

वर नमुद बागायत मिळकतीमधील श्री.अनंत उर्फ आनंत मधुकर रुमडे यांच्या मालकीचे एकूण क्षेत्र ०-१०-२४ हे.आर., आकार ५.१५ रु.पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-०५-१० हे.आर. ही बागायत मिळकत या नोटीसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०३/०२/२०२६

सही /-
**ॲड.प्रविण कृष्णा झेंडेकर**
मु. शिंत्रे गल्ली, पो. आक्षी,
ता.अलिबाग, जि.रायगड
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-भोनंग, ता.अलिबाग, जि.रायगड खालील नमुद वर्णनाची शेतजमिन मिळकत श्री.वैभव पांडुरंग पाटील, रा.मु.भोनंग, पो.सुडकोली, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या खुद्द मालकीची असून सदरील शेतजमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भोनंग, ता.अलिबाग | १२१ | जिरायत क्षेत्र ०-३६-७०<br>पो.ख. ०-००-८०<br>एकूण क्षेत्र ०-३७-५० | ३.३८ |

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून एकवीस (२१) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०३/०२/२०२६

सही /-
**ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर**
मु.शिंत्रे गल्ली, पो.आक्षी,
ता.अलिबाग, जि.रायगड
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्र.९४, ९७/१, १००, १०१, १०७, ११२ व ९९ या मिळकती संदर्भात आमचे अशिलांनी अलिबाग येथील दिवाणी न्यायालयात श्री.अनंत कृष्णा भोईर वगैरे १६, यांचे विरुद्ध विशेष दिवाणी दावा क्र.६४/२००५ हा दावा कराराची विशेष पुर्तता करुन मिळण्यासाठी दाखल केला होता. तो दावा दिनांक ०४.१२.२०१६ रोजी श्रीमती द्रौपदी बळीराम भोईर यांचा १/५ हिस्सा वगळुन उर्वरीत ४/५ हिस्सा संदर्भात मंजूर केला असुन तेवढ्या हिश्श्याचे खरेदीखत आमचे अशिलांच्या लाभात करून देण्याचा व आमचे अशिलांचे लाभात खरेदीखत निष्पादीत व नोंदणीकृत होत नाही तोपर्यंत दावा मिळकतींसंदर्भात वर नमूद मिळकतीं संदर्भात तिऱ्हाईत इमसांचे हक्क निर्माण करू नये असा हुकुमनामा करण्यात आला आहे. त्या हुकुमनाम्याची पूर्तता संबंधित प्रतिवादींनी करुन न दिल्यामुळे आमचे अशिलांनी संबंधित प्रतिवादविरुद्ध अलिबाग येथील दिवाणी न्यायालयात स्पेशल दरखास्त क्र.६६/२०१६ चा दरखास्त अर्ज दाखल केला आहे व तो अद्याप प्रलंबित आहे. अशी वस्तुस्थिती असताना सदर भोईर कुटुंबिय त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करणेचा प्रयत्न करीत आहेत. ही बाब झुंजारराव आणि कंपनी वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१, यांचेवतीने दिनांक ०१.०२.२०२६ रोजीच्या कृषिवल या वर्तमानपत्रात सदर वर नमूद दावा मिळकतीं संदर्भात खरेदी करणेबाबात जाहीर नोटीस प्रसिद्ध करणेत आली, यावरून स्पष्ट होत आहे. ती बाब पूर्णतः चुकीची व बेकायदेशीर असून, त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. सदर हुकूमनाम्याचा भंग करुन आमचे अशिला व्यतिरिक्त भोईर कुटुंबियांनी अन्य कोणाबरोबरही हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास ती बाब हुकूमनाम्याचा भंग ठरेल व अशा वेळी संबंधिताविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करणे व सर्व संबंधितांना दिवाणी तुरुगांत टाकण्याची व संबंधितांच्या मिळकती जप्त करुन विक्री करणेचा आणि न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल फौजदारी कारवाई करणेचा आमचे अशिलांना अधिकार राहील, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख - ०३.०२.२०२६

**(ॲड. सुरेंद्र नारायण जोशी)**
अे-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड,
अलिबाग- रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली मिळकत विद्यमान मालक श्री निहित जयंत शिंदे, सौ. स्मिता स्वप्निल माने यांचेकडून खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीवरील सदर विद्यमान मालकांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कुणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| २९/३ | ०-२०-३० | ०-९९ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून सदर मिळकतीचे खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :-०३/०२/२०२६

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
"गुरूकृपा" अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे पोटलज खुर्द, ता. सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| सौ. प्रतिभा सुरज पाटील.<br>श्री. सुरज प्रल्हाद पाटील. | १२८ | ०-२४-०० | ०-०९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ०४/०२/२०२६

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६अ राठोड सदन ऑफिस नं.७ पाली,
ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

अर्जदार तर्फे वकिल ॲड. अतुल अ.चौगुले

**श्रीवर्धन येथील मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो यांचे न्यायालयात**

दिवाणी चौ. अर्ज नं.०२/२०२६
नि.७/ड

**-: जाहिर नोटीस :-** नेता. १६/३/२६

१) कु. सुमैय्या सुलेमान उल्डे
वय वर्षे २३, धंदा - शिक्षण
२) कु. सलवा सुलेमान उल्डे
वय वर्षे २२ धंदा - शिक्षण
३) कु. सुलतान सुलेमान उल्डे
वय वर्षे १७ धंदा - शिक्षण
४) श्री. सुलेमान दाऊद उल्डे ... अर्जदार
वय वर्षे ६०, धंदा - नोकरी
अ. क्र १ ते ४ रा. निगडी, पो. सायगाव
ता. श्रीवर्धन, जि. रायगड
५) श्रीम सॉलीया मजहर सय्यद
वय वर्षे २९ धंदा-गृहिणी
रा. मझहर सैय्यद, मुस्लीम कॉलनी, आंबेडकर चौक,
मनमाड, ता. नांदगाव, नाशिक,

विरुद्ध

कोणीही नाही ... सामनेवाला

सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, निगडी, पो. सायगाव, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील मयत कै. श्रीम शराफत सुलेमान उल्डे यांचा मृत्यू त्यांच्या राहत्या घरी निगडी, ता. श्रीवर्धन येथे दि. १६/०५/२०१३ रोजी झाला आहे. त्यांच्या पश्चात मयताचे वारस अर्जदार आहेत. मयत कै.श्रीम शराफत सुलेमान उल्डे यांचा निगडी येथे मृत्यू झालेला आहे. तरी त्यांच्या निधानानंतर त्याच्या पश्चात अर्जदार यांचे नाव हे सदर शासकीय, निमशासकीय, बँका, पतपेढ्या करणे करिता अर्जदार हे कायदेशिर वारस असल्याबाबतचा सक्षम न्यायालयाचा वारस दाखला आणण्यास सांगितले. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदारांना देण्याबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नसून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर नोटीस प्रसिद्ध केली.

श्रीवर्धन
ता. १७/०१/२०२६

सही/-
**क.लिपीक**
**दिवाणी न्यायालय, श्रीवर्धन**

सही/-
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, श्रीवर्धन**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कुणे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक दर्शना दत्तात्रेय ठाकूर वगैरे यांचेकडून कायम मालकी हक्काने खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**:: मिळकतीचे वर्णन ::**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) | भुधारणा पद्धत |
|---|---|---|---|---|
| कुणे | ४८/२ | ०-५८-५०<br>०-०८-१०<br>०-६६-६० | १२.३१ /- | वर्ग-१ |

सदर मिळकतीपैकी ०-१६-०० हे.आर. (१६.०० गुंठे) क्षेत्रफळ असलेली मिळकत

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतींत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कब्जा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु.करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०४/०२/२०२६

सही /-
**ॲड. अनिकेत एच. गुरव**
पत्ता : श्रीबाग नं.२, अलिबाग, जि.रायगड
ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी,
शिवाजी चौक, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल नं. : ९८५०४०२०५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की खालील वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी त्या मिळकतीचे मालक १ श्री. शशिकांत अनंता जुवेकर २. श्रीम. आरती शशिकांत जुवेकर यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे बोरीवली ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ८२ | ५२ | २.२६.०० | २२.६० |
| ८२ | ५३ | २.२६.०० | २२.६० |

सदर मिळकतीवरील घर नं.१२४९, क्षेत्र ३०X२७ चौ.फु सह

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा कबजा कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ०४-०२-२०२६

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं-९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहीर नोटीसीस हरकत

आपल्या दिनांक ३०-१-२०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीसीस आमचे अशील श्री.सचिन गजराज जैन, रा.मिरची गल्ली, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांची सक्त हरकत आहे.

मी गेली ५० वर्षे आपण दिनांक ३०-१-२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या खालील मिळकतीत वास्तव्य करीत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

१) अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, सि.स.नं.४०३, क्षेत्र २३६.७९ चौ.मी., आकार रुपये ३.०० पैसे

२) अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, सि.स.नं.४०३ क, क्षेत्र ३१६.०० चौ.मी., आकार रुपये ०.०० पैसे

वर नमुद संपूर्ण मिळकत व या मिळकतीमधील नगर परिषद मालमत्ता घर क्रमांक ९२७ व ९२८ या घर मिळकतीसह.

मी व माझे कुटूंब हे संबंध मालमत्तेमध्ये गेल्या ५० वर्षापासून भाडेकरु म्हणून राहत आहोत. आमचा ताबा नेहमीच शांत, सातत्यपूर्ण व मालकांच्या माहितीत राहिला आहे. आम्ही वेळोवेळी भाडे भरले असून, मालमत्तेची देखभाल देखील करत आलेलो आहोत.

सदर घर मालकांनी भाडेकरार रद्द करण्याची नोटीस किंवा कायद्यानुसार आवश्यक कोणतीही नोटीस आम्हाला दिलेली नाही. त्यामुळे भाडेकरु हक्क न निकाली काढता मालमत्ता विकण्याचा कोणताही प्रयत्न कायदेशीर दृष्ट्या अवैध आहे.

मालमत्तेचे विक्री/हस्तांतरणास मी ठाम हरकत नोंदवित आहे. मी मालमत्ता विक्रीस संमती दिलेली नाही. मी घर खाली करण्यास मान्यता दिलेली नाही. या मालमत्तेबाबत कोणीही व्यक्ती किंवा संस्था व्यवहार करत असल्यास तो त्यांच्या स्वत:च्या जोखमीवर करीत आहेत. सदरची मालमत्ता ही प्रस्थापित भाडे हक्काखाली आहे याची मिळकत विकत घेणाऱ्यांनी व विकत देणाऱ्यांनी नोंद घ्यावी.

सदरची वरील हरकत नोंदीत घ्यावी आणि भाडेकरु हक्काचे उल्लंघन करुन कोणतीही कारवाई करु नये सदर मिळकत विक्रीस व खरेदीदारीस माझी सक्त हरकत आहे.

दिनांक :- ४-२-२०२६

सही/-
**(श्री. सचिन गजराज जैन)**
रा. मिरचीगल्ली, अलिबाग

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळिवण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकतींचे विद्यमान मालक १) श्री. जितेंद्र रामदास पाटील २) श्री. विश्वास रामदास पाटील ३) श्री. मनोहर रामदास पाटील ४) श्रीमती. संध्या दिलीप पाटील ५) श्रीमती कल्पना जयेंद्र म्हात्रे ६) श्रीमती हिरा संदीप मोहीते यांचेकडुन खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतींमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १९३ | ००-६९-१० | १०.३३ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- ०३/०२/२०२६

**ॲड. रविंद्र वि. ओक**
'गुरूकृपा'',अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता.
अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक स्वप्ना अरूण पाटील यांचेकडुन कायम मालकी हक्कने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| आक्षी, ता.अलिबाग | १५२/२/८ | ०-०४-९५ बागायत<br>०-००-१५ पो.ख.<br>०-०५-१० एकुण | १.६० |

वर नमुद मिळकतीपैकी स्वप्ना अरूण पाटील यांचा असणारा अविभक्त हिस्सा या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - ०३/०२/२०२६

**ॲड राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटिस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे सहाण, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाची बिनशेती व शेतजमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा साठेकरार आमचे आशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे सहाण, ता.अलिबाग येथील बिनशेती जमीन मिळकत त्यास भूमापन क्रमांक व उपविभाग २८९/२, क्षेत्र ६.९०.९४ आर चौ.मी., आकार रु.७०.००/- तसेच शेतजमीन मिळकत त्यास भूमापन क्रमांक व उपविभाग २८९/५/ई, (खाते क्रमांक ६०९), जिरायत ०-५७-७० हे.आर,आकार रु.४.०० वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी विद्यमान मालकांचे मालकीची ०-१५-१० गुंठे क्षेत्र मिळकत हा या नोटिसचा विषय आहे.

तरी वर वर्णन केलेली बिनशेती व शेतजमीन मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील जमिन व घर मिळकतीं संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०४.०२.२०२६

**ॲड. मिलिंद चव्हाण**
८, आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री विशाल सुरेंद्र विज व श्रीमती सोमा विशाल विज, दोघे रा. ७०१, वेव्हलेश, पेरी क्रॉस रोड, पोलिस कमिशनर ऑफिसच्या मागे, बांद्रा (प.), मुंबई, ४०००५०,, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे टेंभरे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ५४/१/क | १.०४.००<br>पो.ख. ०.०७.००<br>एकुण १.११.०० | ५.१९ |

यापैकी खरेदी देणार श्री. दिबेनंदु चक्रबोर्ती यांच्या हिश्श्याचे ०.२०.०० हे.आर.पॉ. क्षेत्र.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.


कर्जत
दिनांक :- ०४/०२/२०२६.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, 'पुष्प विमल 'निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




# निवडक

## वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**उरण :** फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन संपन्न झाले. वार्षिक क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन रविंद्र पाटील, ट्रस्टी जे.एन.पी.ए.यांच्या हस्ते मैदानाचे पूजन व नारळ वाढवून करण्यात आले.



प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर, डॉ.श्रेया पाटील कार्याध्यक्ष, महाविद्यालयातील उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक व महाविद्यालयातील सेवक उपस्थित होते. रविंद्र पाटील यांनी आपल्या मनोगतातून खेळाडूना प्रोत्साहन दिले. खेळ हा मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचा असतो. खेळाडूनी खेळात मित्रत्व जपले पाहिजे, त्यांच्या हस्ते सामन्यांचे उद्घाटन झाले. प्रा.देवेंद्र कांबळे, क्रीडा संचालक यांच्या माध्यमातून स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कबड्डी, क्रिकेट, भालाफेक, थाळीफेक, लांबउडी, धावणे, बुद्धिबळ, इत्यादी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. प्राचार्य,डॉ.आमोद ठक्कर यांनी खेळाडू विद्यार्थ्यांशी ओळख करून घेतली स्पर्धा अतिशय खेळीमेळीत व्हायला हवी, असे मत व्यक्त केले.

## ‘गोव्यात आयपीएल आणण्याचे स्वप्न ’

**वास्को :** वेर्णा येथील १९१९ स्पोर्टस क्रिकेट स्टेडियमवर पुढील तीन वर्षांत इंडियन प्रीमिअर लीग टी २० सामने आयोजित करण्याचे स्वप्न आहे. आयपीएल सामने घेण्यासाठी प्रेक्षक क्षमता २५–३० हजार असणे आवश्यक आहे आणि त्यासाठी योग्य पावले उचलली जातील, असे स्टेडियमचे मालक आणि चिखलीचे सरपंच कमलाप्रसाद यादव यांनी सांगितले. सध्या स्टेडियमवर वर्ल्ड लेजंड प्रो टी–२० लीग चालू असून त्यात भारताबरोबरच आंतरराष्ट्रीय दिग्गज खेळाडू सहभागी आहेत. कमलाप्रसाद यादव म्हणाले की, या स्पर्धेमुळे गोव्यात आर्थिक उलाढाल वाढली असून स्थानिकांसह पर्यटन क्षेत्रालाही चालना मिळाली आहे. भविष्यात अशा अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा येथे आयोजित करण्याचा त्यांनी निर्धार व्यक्त केला. स्टेडियमवर वूमन प्रीमिअर लीग टीचे सामने आयोजित करण्यासाठीही पावले उचलण्यात येणार आहेत. काही महिन्यांपूर्वी मुलांसाठी मोफत क्रिकेट प्रशिक्षणाचे आयोजित केले होते. पुढच्या ६ महिन्यांत या स्टेडियमवर मुलांसाठी मोफत क्रिकेट प्रशिक्षण आणि युवा क्रिकेट अकादमी स्थापन करण्याचेही कार्यक्रम आखण्यात आले आहेत, ज्यामुळे गोव्यातील क्रिकेटपटूंचा दर्जा वाढेल, असेही कमलाप्रसाद यादव म्हणाले. भविष्यात गोव्याचा आयपीएल टी–२० आणि वूमन प्रीमिअर लीग टी–२० क्रिकेट संघ व्हावा यासाठी नामवंत उद्योजकांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे यादव म्हणाले.

## एलिट क्लबमध्ये देविकाचा समावेश

**नवी दिल्ली :** भारताची २० वर्षीय उदयोन्मुख शटलर देविका सिहागने रविवारी थायलंड मास्टर्स २०२६ मध्ये इतिहास रचला. बँकॉक येथे खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात तिने मलेशियाच्या गो जिन वेईला हरवून आपल्या कारकिर्दीतील पहिले बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर सुपर ३०० विजेतेपद पटकावले.



देविकाने पहिला गेम २१–८ च्या मोठ्या फरकाने जिंकला. दुसऱ्या गेममध्ये ती ६–३ अशी आघाडीवर असताना, मलेशियाच्या खेळाडूला दुखापतीमुळे निवृत्त व्हावे लागले आणि देविकाला विजेती घोषित करण्यात आले. देविकाने संपूर्ण स्पर्धेत एकही गेम गमावला नाही. तिने प्रत्येक सामना सरळ सेटमध्ये जिंकला. उपांत्यपूर्व फेरीत तिने स्पर्धेतील नंबर–१ सीड सुपनिदाला हरवून मोठा उलटफेर केला होता. या विजयासह देविका सुपर ३०० विजेतेपद जिंकणारी भारताची केवळ तिसरी महिला खेळाडू ठरली आहे. यापूर्वी हा पराक्रम केवळ पीव्ही सिंधू आणि सायना नेहवाल यांच्या नावावर होता. देविका म्हणाली– मी खूप आनंदी आहे कारण हे माझे पहिले सुपर ३०० विजेतेपद आहे. मी येथे खूप चांगले सामने खेळले आणि खूप काही शिकले आहे. मला फक्त माझे १००% द्यायचे होते. याच विचाराने मला आत्मविश्वास दिला.

## टी-२० विश्वचषक स्पर्धा सराव सामना

# भारताचा अमेरिकेवर विजय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या अ संघाने टी–२० विश्वचषक २०२६ वॉर्म अप सामन्यात अमेरिकेवर ३८ धावांनी दणदणीत विजय मिळवला. टीम इंडियाने अमेरिकेला १९.४ षटकांत २०० धावांवर सर्वबाद केलं.



भारताने अमेरिकेला विजयासाठी २० षटकांत २३९ धावांचं आव्हान दिलं होतं. याशिवाय तिलक वर्माने दुखापतीतून सावरल्यानंतर अष्टपैलू कामगिरी करत फॉर्म सिद्ध केला आहे. टी–२० विश्वचषक २०२६ ला येत्या ७ फेब्रुवारीपासून सुरूवात होणार आहे. भारतीय संघ अमेरिकाविरूद्ध सामन्याने सुरूवात करणार आहे. तत्पूर्वी अमेरिकेचा संघ सराव सामना खेळत आहे. तिलक वर्माला न्यूझीलंडविरूद्ध टी–२० मालिकेपूर्वी दुखापत झाल्याने त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती.

यामुळे तो पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेला मुकला होता. पण आता टी–२० विश्वचषकापूर्वी त्याने फिटनेस परत मिळवला असून तो सराव सामना खेळत आहे. या सराव सामन्यात त्याने आपला फिटनेस आणि फॉर्म दोन्ही सिद्ध केलं आहे.

भारताने दिलेल्या २३९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना संघाची सुरूवात चांगली झाली पण रवी बिश्नोईने मोनांक पटेलला क्लीन बोल्ड करत संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला. तर अँड्रियू गसने ३१ चेंडूत ५ चौकार व एका षटकारासह ४४ धावांची खेळी केली. तर साईतेजा मुक्कामल्ला शून्यावर परतला.मिलिंद कुमार १८ धावा करत बाद झाला. मिलिंद कुमारला झेलबाद करण्यासाठी तिलक वर्माने कमालीचा रनिंग झेल टिपला. संजय कृष्णमूर्तीने १८ चेंडूत २ चौकार व ४ षटकारांसह ४१ धावा केल्या. हरमीत सिंग ९ चेंडूत २५ धावा बाद झाला. भारताकडून फिरकीपटू रवी बिश्नोईने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. खलील अहमदने २ विकेट्स, अशोक शर्मा व तिलक वर्मा यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतल्या. तर अखेरच्या २०व्या षटकात नमन धीरने २ विकेट्स घेत अमेरिकेला सर्वबाद केलं. भारताच्या अ संघाने फलंदाजीत वादळी कामगिरी केली. अमेरिकेने नाणे फेक जिंकत भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारताकडून प्रियांश आर्य व एन जगदीशनची जोडी सलामीला उतरली होती. प्रियांश व जगदीशन यांनी संघाला शानदार सुरूवात करून देत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. प्रियांश आर्या १३ चेंडूत ३ चौकार व २ षटकारांसह २८ धावा केल्या. एन जगदीशनने सराव सामन्यात ५५ चेंडूच ११ चौकार व ४ षटकारांसह १०४ धावांची शतकी खेळी केली.

यानंतर तिलक वर्माने २४ चेंडूत ३ चौकार व २ षटकारांसह ३८ धावा करत आपला फॉर्म सिद्ध केला. कर्णधार आयुष बदोनीने २६ चेंडूत६ चौकार व ४ षटकारांसह ६० धावांची नाबाद खेळी केली.

# राष्ट्रीय शालेय नेटबॉल स्पर्धेत महाराष्ट्राला विजेतपद

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे नांदेड येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय शालेय नेटबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने विजेतेपद पटकावले. छत्रपती संभाजीनगरच्या जिज्ञासा चौहान हिने १७ वर्षांखालील मुलींच्या गटात तर विरोचन शिंदे याने १४ वर्षांखालील मुलांच्या गटात उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन करत विजयात मोलाचा वाटा उचलला.



नांदेड येथे गुरू गोविंदसिंग क्रीडांगणावर २७ ते ३१ जानेवारीदरम्यान १४ वर्षांखालील मुले व मुली तसेच १७ वर्षांखालील मुलींच्या राष्ट्रीय शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धा पार पडल्या. तिन्ही गटात महाराष्ट्राने विजेतेपद पटकावले.

अध्यक्ष सतीश इंगळे, जयकुमार टेंभरे, प्रीती सोपनीस, लक्ष्मण दातीर, प्रवीण कुपटीकर यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना सुवर्णपदक, प्रमाणपत्र आणि विजेतेपदाचा करंडक देण्यात आला. मुलांच्या गटात उत्कृष्ट कामगिरी करणारा विरोचन शिंदे हा पद्मश्री शंकरबापू आपेगावकर शाळेचा विद्यार्थी आहे. समृद्धी भोसेकर, पवनकुमार कछोट, विश्वास पाटील, हर्ष मगरे, आकाश सरदार, अभिजित देशमुख, गजानन दीक्षित यांनी त्याचे अभिनंदन केले.

## भारत –पाक वाद पेटला

**मुंबई:** भारत आणि श्रीलंकेच्या संयुक्त यजमानपदाखाली ७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या टी–२० वर्ल्ड कपपूर्वी मोठा वाद निर्माण झाला आहे. पाकिस्तान सरकारने वर्ल्ड कप खेळण्यास संमती दिली असली, तरी भारताविरुद्ध सामना खेळण्यास नकार दिल्याने क्रिकेटविश्वात खळबळ उडाली आहे. या निर्णयानंतर दोन्ही देशांतील माजी क्रिकेटपटूंमध्ये जोरदार शब्दयुद्ध सुरू झाले आहे आणि हा वाद दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालला आहे. पाकिस्तानकडून शाहिद आफ्रिदी, मोहम्मद युसूफ आणि दानिश कनेरिया, तर भारताकडून सुनील गावसकर, हरभजन सिंग, आर. अश्विन आणि मदनलाल यांनी पाकिस्तानच्या भूमिकेवर थेट आणि तिखट प्रतिक्रिया दिल्या.

# पाकिस्तानने सर्व सीमा ओलांडल्या



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान सरकारने आगामी ट्वेंटी–२० वर्ल्ड कप स्पर्धेत त्यांचा संघ भारताविरुद्धच्या लढतीत खेळणार नसल्याचे सोशल मीडियावरून जाहीर केले. पण, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने अद्याप हा निर्णय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे कळवलेला नाही. भारताविरुद्ध न खेळण्याच्या सरकारच्या निर्णयाचे पालन करण्याची ठाम भूमिका पीसीबीने घेतली आहे. ते यासाठी आयसीसीशी कोणताही संपर्क करू इच्छित नाहीत. त्यामुळे आयसीसीलाही काय कारवाई करावी हे कळेनासे झाले आहे, असे वृत्त टेलिकॉम एशिया स्पोर्टने दिले आहे.

पाकिस्तान सरकारने सोशल मीडियावरून त्यांचा निर्णय जाहीर केला आहे आणि त्यामुळे आयसीसीला याप्रकरणी वेगळे लेखी निवेदन देण्याची गरज नाही, असे सूत्रांच्या हवाल्याने म्हटले आहे. शाहबाझ शरिफ यांच्या सरकारने रविवारी सोशल मीडियावर जाहीर केले की, भारत व श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली ७ फेब्रुवारी ते ८ मार्च या कालावधीत होणाऱ्या स्पर्धेत पाकिस्तान सहभाग घेणार आहे. पण, भारताविरुद्धच्या लढतीत आमचा संघ खेळणार नाही. भारताने कधी आयसीसीला कळवले होते का की ते पाकिस्तानला जाणार नाहीत? आणि जेव्हा भारताकडून सरकारचे पत्र दाखवण्याची मागणी करण्यात आली तेव्हा त्यांनी ते कधीही सादर केले नाही. त्यामुळे आम्हालाही आयसीसीला लेखी पत्र देण्याची गरज नाही, असे पीसीबीच्या सूत्राने सांगितले.

आयसीसीला पत्राद्वारे अधिकृतपणे कळविण्यास नकार देणे हा मुद्दा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न म्हणून पाहिले जात असले तरी, बहिष्कार टाळण्यासाठी आयसीसीच्या कोणत्याही तोडग्याच्या आवाहनाकडे पीसीबी लक्ष देणार नाही हे स्पष्ट आहे, कारण हा निर्णय सरकारी पातळीवर घेण्यात आला आहे. भारत विरूद्ध पाकिस्तान सामना न झाल्यास आयसीसीला मोठा आर्थिक फटका बसणार आहे आणि त्याची झळ पाकिस्तानलाही सोसावी लागणार आहे.

आयसीसीने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला परिणामांना सामोरे जाण्याची तयारी ठेवा, असा इशारा दिला आहे. जर आयसीसीने काही कारवाई केल्यास, त्यांच्या विरोधात जाण्याची तयारी पाकिस्तान सरकारने केली आहे. टेलिकॉम एशिया स्पोर्टच्या वृत्तानुसार पाकिस्तान सरकार कायदेशीर कारवाई करण्याच्या तयारीत आहे. नक्की यांना भेटण्यापूर्वी पंतप्रधान शरिफ यांनी पीसीबीचे माजी अध्यक्ष नजाम सेठी यांची भेट घेतली होती.

## रोइंग चॅम्पियनशिप स्पर्धा

# नायब सुभेदार बलराजला सुवर्णपदक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन आर्मीमध्ये नायब सुभेदार आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदार्पण करणारे, हरियाणातील कैमला गावाचे बलराज पंवार यांनी पुन्हा एकदा राज्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्वल केले आहे. बलराज यांनी सीनियर नॅशनल रोइंग चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकले. या चॅम्पियनशिपमध्ये बलराज यांनी ७ मिनिटे १२ सेकंदात २००० मीटरची शर्यत पूर्ण केली. बलराज यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या या यशाची माहिती शेअर केली.

गेल्या २७ जानेवारी ते १ फेब्रुवारीपर्यंत पुण्यात सीनियर नॅशनल रोइंग चॅम्पियनशिप झाली. या चॅम्पियनशिपमध्ये बलराज यांनी आपले कौशल्य दाखवले आणि सुवर्णपदकावर कब्जा केला. सुवर्णपदक विजेता बलराज पंवार यांनी सांगितले की, पुण्यात आयोजित रोइंग चॅम्पियनशिपमध्ये १८ स्पर्धकांनी भाग घेतला होता. ज्यात माझी वेळ ७ मिनिटे १२ सेकंद होती.

त्यांनी आर्मी सर्व्हिसेसकडून भाग घेतला होता. दुसऱ्या स्थानावर इंडियन आर्मी राहिली आणि तिसऱ्या स्थानावर हरियाणा राहिला आणि चौथ्या स्थानावर झारखंड राहिला होता. बलराज यांनी सांगितले की रोइंगमध्ये हवा आणि पाण्याची धार देखील विजय आणि पराभवावर परिणाम करते. ज्यामुळे जास्त वेळ लागतो. बलराज यांचे म्हणणे आहे की त्यांनी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदार्पण केले होते, परंतु ते पदक जिंकू शकले नाही, पण आता त्यांचे पूर्ण लक्ष एशियन गेम्स आणि ऑलिम्पिकवर आहे.



बलराज पंवार हे करनाल जिल्ह्यातील कैमला गावचे रहिवासी आहेत. १० वर्षांचे असताना त्यांचे वडील रणधीर पंवार यांचे निधन झाले. आई कमला पंवार यांनी भाजीपाला आणि दूध विकून, बांधकाम आणि कपड्यांच्या कारखान्यात काम करून बलराज आणि त्यांच्या चार भावंडांचे पालनपोषण केले.बलराज विवाहित असून त्यांना एक मूल आहे. २०१८ मध्ये ते भारतीय सैन्यात शिपाई म्हणून भरती झाले. सध्या ते नायब सुभेदार आहेत. ऑक्टोबर २०२१ पासून ते पुण्यातील आर्मी रोइंग नोडमध्ये प्रशिक्षण घेत आहेत.

बलराज यांनी सैन्यात आपल्या ६ फूट उंचीमुळे रोइंग सुरू केले आणि पहिल्याच प्रयत्नात बटालियन रेगाटा जिंकले. त्यांची प्रगती खूप वेगाने झाली – फक्त ४–५ वर्षांत ते आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले. ते भारतीय रोइंगचे एमएस धोनी म्हणून ओळखले जातात, कारण ते शांत आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण असतात. त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेऊन देशाचा गौरव वाढवला आहे.

आशिया–ओशनिया ऑलिम्पिक क्वालिफायरमध्ये कांस्यपदक जिंकून पॅरिस २०२४ साठी भारताचा पहिला रोइंग कोटा मिळवला.पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये पुरुष सिंगल स्कल्समध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले.

## टी-२० विश्वचषक स्पर्धा | मुंबईत १२ आणि कोलंबोत ८ संघांचे कर्णधार सहभागी

# कॅप्टन्स डे दोन शहरांमध्ये होणार


**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी–२० विश्वचषकाची सुरुवात ७ फेब्रुवारीपासून होणार आहे. त्यापूर्वी, ५ फेब्रुवारी रोजी आयसीसीने कॅप्टन्स डे आयोजित केला. कॅप्टन्स डे मुंबई (भारत) आणि कोलंबो (श्रीलंका) या दोन शहरांमध्ये होईल. कॅप्टन्स डे हा एक मीडिया कार्यक्रम आहे, जिथे कर्णधार माध्यमांशी संवाद साधतील.

मुंबईत कॅप्टन्स डे मीटमध्ये एकूण १२ संघांचे कर्णधार सहभागी होतील. हा कार्यक्रम ५ फेब्रुवारी रोजी आयोजित केला जाईल, ज्यात भारत, अफगाणिस्तान, कॅनडा, इंग्लंड, इटली, नामिबिया, नेपाळ, न्यूझीलंड, स्कॉटलंड, दक्षिण आफ्रिका, अमेरिका आणि वेस्ट इंडिजचे कर्णधार सहभागी होतील. सर्व कर्णधारांना दोन वेगवेगळ्या गटांमध्ये विभागले गेले आहे, जे माध्यमांशी संवाद साधताना स्पर्धे पूर्वीच्या त्यांच्या तयारी आणि रणनीतींवर चर्चा करतील. ग्रुप–१ ची पत्रकार परिषद दुपारी ३:०० वाजता आणि ग्रुप–२ ची पत्रकार परिषद ३:३० वाजता सुरू होईल. ही कॅप्टन्स डे मीट बीसीसीआय कार्यालय, वानखेडे स्टेडियम येथे आयोजित केली जाईल.

### भारतातील ५, श्रीलंकेतील ३ मैदानांवर स्पर्धा

**भारतात अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियम, नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियम, कोलकातामधील ईडन गार्डन्स स्टेडियम, चेन्नईमधील चेपॉक स्टेडियम आणि मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर स्पर्धेचे सामने खेळले जातील. तर श्रीलंकेत कोलंबो आणि कँडी येथे सामने होतील. कोलंबोमध्ये आर प्रेमदासा आणि सिंहलीज स्पोर्ट्स क्लब स्टेडियमवर सामने खेळले जातील. टीम इंडिया मुंबई, दिल्ली, कोलंबो आणि अहमदाबादमध्ये ग्रुप स्टेजचे सामने खेळेल.**



५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये कॅप्टन्स डेचे आयोजन केले जाईल. या कार्यक्रमात श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, आयर्लंड, नेदरलँड्स, ओमान, पाकिस्तान, यूएई आणि झिम्बाब्वे संघांचे कर्णधार सहभागी होतील. येथेही सर्व कर्णधारांना दोन वेगवेगळ्या गटांमध्ये विभागले गेले आहे, जे माध्यमांशी संवाद साधताना स्पर्धेपूर्वी त्यांच्या तयारी आणि रणनीतींवर चर्चा करतील. ग्रुप–१ ची पत्रकार परिषद दुपारी १२:०० वाजता, ग्रुप–२ ची पत्रकार परिषद १२:३० वाजता सुरू होईल. हा कार्यक्रम कोलंबो येथील मर्केंटाइल क्रिकेट असोसिएशनमध्ये केला जाईल.

# वर्ल्डकप स्पर्धेवर बहिष्काराचा इतिहास जुनाच

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी २० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेपूर्वी पाकिस्तानची नाटकं सुरू झाली आहे. आता त्याने भारताविरूद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकल्याचा नवा अंक सुरू केला आहे.

पाकिस्तान वर्ल्डकप स्पर्धेतील सामन्यावर बहिष्कार टाकणारा पहिला संघ नाही. यापूर्वी चार संघांनी अशी कृती केली आहे. आयसीसी स्पर्धांचा इतिहास ५० वर्षे जुना आहे. १९७५ मध्ये पहिला पुरूष वर्ल्डकप स्पर्धा पार पडली होती. तेव्हापासून आतापर्यंत बहिष्काराचे काही प्रकरणं घडली आहेत. यापूर्वी दोन वेगवेगळ्या वर्ल्डकप स्पर्धेतील ४ सामन्यात बहिष्कार टाकला गेला आहे. त्यामुळे पाकिस्तानने भारताविरूद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकला हे काय नवीन नाही.

सर्वात पहिल्यांदा १९९६ च्या वनडे वर्ल्डकप स्पर्धेत असा प्रकार घडला होता. तेव्हा ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिजने श्रीलंकेतील सामन्यावर बहिष्कार टाकला होता. त्यावेळी एलटीटीईचा श्रीलंकेत प्रभाव होता. तेसच वर्ल्डकपच्या एक महिन्याआधी या दहशतवादी संघटनेने बँकेत स्फोट घडवला होता. यात ९१ जणांचा मृत्यू झाला होता. तेव्हा ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिजने सुरक्षेचं कारण देत बहिष्कार टाकला होता. आयसीसीने या संघांवर कारवाई केली नाही. उलट दोन्ही संघांना प्रत्येकी २ गुण गमवावे लागले होते. त्यामुळे श्रीलंकेला फायदा झाला. अंतिम फेरीत ऑस्ट्रेलियाला पराभूत करून श्रीलंकेने जेतेपदावर नाव कोरलं होतं.

२००३ वनडे वर्ल्डकप स्पर्धेत असंच घडलं. तेव्हा इंग्लंड आणि न्यूझीलंड या संघांनी आपल्या सामन्यांवर बहिष्कार टाकला होता. इंग्लंडने झिम्बाब्वेविरुद्धचा सामना राजकीय कारणामुळे खेळला नव्हता. सुरक्षेचं कारण देत सामना खेळण्यास नकार दिला. तर न्यूझीलंडनेही सुरक्षेचं कारण पुढे करत केनियाविरुद्ध सामना खेळला नाही. त्यामुळे झिम्बाब्वे आणि केनियाला यांना प्रत्येकी २ गुण मिळाले होते. मागच्या इतिहास पाहता पाकिस्तानवर काही कारवाई होणार नाही. पण पाकिस्तानने सामने श्रीलंकेत आयोजित व्हावेत यासाठी आयसीसी आणि बीसीसीआयसोबत करार केला होता. आता करार मोडत असल्याने पाकिस्तान संघ अडचणीत येऊ शकतो.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१–२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग–email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए–५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२–२२८८४५३८.
■ **संस्थापक–संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)